नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## पहलगाम हल्ल्यानंतर दहशतवाद्यांचा आनंदोत्सव

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :
पहलगाममध्ये २६ जणांना ठार मारल्यानंतर, दहशतवाद्यांनी घटनास्थळीच आनंद साजरा केला. आनंद साजरा करण्यासाठी त्यांनी हवेत अनेक राऊंड फायर केले. राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) तपासात हे उघड झाले आहे. रिपोर्ट्सनुसार, ३ दहशतवाद्यांनी हा हल्ला केला. घटनेनंतर लगेचच एका स्थानिक व्यक्तीने दहशतवाद्यांना हवेत गोळीबार करताना पाहिले. ही व्यक्ती आता एनआयएसाठी एक महत्त्वाचा साक्षीदार बनली आहे.

हल्ल्याच्या वेळी, परवेझ अहमद जोथर आणि बशीर अहमद हे दोन स्थानिक नागरिक बैसरनमध्ये दहशतवाद्यांच्या सामानाचे रक्षण करत होते. गेल्या महिन्यात एनआयएने या दोघांनाही अटक केली होती.

* वर्ष ५२ * अंक १७ * * अकोला * गुरुवार, दिनांक १७ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## स्वस्ताई तरो, शेतकरी मरो...

काल एक अतिशय वेदनादायक प्रकारची बातमी अनेक वृत्तपत्रांनी मोठ्या ठसक्यात प्रकाशित केलेली आहे. ती बातमी काय असावी तर ती बातमी अशी आहे की, जून महिन्यामध्ये २.३% महागाई कमी झालेली आहे. विशेष म्हणजे टक्केवारीनुसार जी महागाई कमी झालेली आहे, त्याच्यामध्ये काही मुद्द्यांचा उहापोह करणे अत्यंत गरजेचे आहे. तर महागाई कमी झाली म्हणजे काय झाले आहे त्याचा विचार केला पाहिजे. महिला वापरत असलेल्या कोणत्याही सौंदर्यप्रसाधनांचे भाव कमी झालेले नाहीत, ते पूर्वीपेक्षा वाढलेले आहेत. किराणा भुसार दुकानातील शेतमाल चोरून चोरट्यांनी कमी पैशात विकला म्हणून महागाई कमी झालेली नाही. पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी झालेले नाहीत किंवा सलून मधील केस कापण्याचे आणि दाढीचे दरही कमी झालेले नाहीत, ते वाढलेले आहेत. रेडीमेड कपडे आणि कॉटन, कॉटन मिक्स किंवा टेरिकॉट, कपड्यांचे तागे यांचेही दर कमी झालेले नाहीत तर ते सुद्धा वाढलेलेच आहेत. बाकी सिनेमांच्या तिकिटाचे अजिबात विचारु नका, कारण सिनेमांचे तिकिटे दरवर्षी शंभर ते दीडशे टक्के दराने वाढतात. विशेषतः कारखान्यांमध्ये जो माल तयार होतो त्याचे बाजारातील दर अजिबात कमी झालेले नाहीत. मग नेमके कशाचे दर कमी झाले आणि मग स्वस्ताईचा टक्का कशामुळे वाढला त्यावर विवेचन करूया. नक्कीच सध्या स्वस्ताई वाढली आहे. नक्कीच त्याचा फायदा उपभोग घेणाऱ्यांना म्हणजेच उपभोक्त्यांना झालेला आहे. या सगळ्या गडबडीमध्ये फक्त शेतकऱ्यांच्या शेतमालाचे दर कमी झालेले आहेत. खरे तर राज्यातील असो किंवा केंद्रातील असो, कोणत्याही सरकारने शेतक?यांच्या शेतमालाचे भाव कमी झाल्याबद्दल दुःख व्यक्त करायला पाहिजे. पण सरकार काय किंवा श्रीमंत उपभोक्ता वर्ग काय शेतकऱ्यांचा शेतमाल कमी भावाने मिळतोय, त्याबद्दल अत्यंत मोठा उत्सवी आनंद व्यक्त करीत आहेत ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. महागाई ५.८% वरून जवळजवळ दोन टक्के घसरलेली आहे म्हणजेच जून महिन्यात भाजीपाला स्वस्त झाला आहे. या स्वस्ताईमुळे भाजीपाला उत्पादन करणारा शेतकरी वर्ग संपूर्णपणे खड्ड्यात गेलेला आहे. डाळीचे भाव जवळ जवळ १२% कमी झाले म्हणजे तूर, मूग, उडीद यांच्या दराबाबत मोठी घसरण झाल्यामुळे ऐन पेरणीच्या तोंडावर शेतकऱ्यांचे नियोजन बिघडलेले आहे. त्यातच साखरही कडू झालेली आहे, म्हणजेच घसरलेली आहे. थोडक्यात काय झाले आहे तर भाजीपाला अन्नधान्य डाळी यांचे दर घटलेले आहेत. कांद्याचे दर तर पार ससपातळाच्याही खाली गेलेले आहेत. सोयाबीन, हरभरा किंवा कापूस म्हणा यांचे दर तर वाढतच नाहीत आणि या दराच्या घसरणीचा आनंदोत्सव होतो. आपला देश शेतीप्रधान आहे असे म्हणतात पण शेती पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या स्वप्नांची आणि त्यांनी काबाडकष्ट करून घाम गाळून पिकवलेल्या शेतमालाची ज्यप्रकारे माती होत आहे त्याचे कोणालाही सोयरसुतक नाही. शेतकरी हिताच्या गप्पा मारणारे अगदी बेंबीच्या देठापासून जोरजोरात बोंबा मारतात की जणू काही आम्ही शेतक?यांचे कैवारीच आहोत. आम्ही तर शेतकऱ्यांना कर्जमाफी करून देऊ आणि फक्त कर्ज माफी नाही तर वीज बिल सुद्धा कमी करू, पण हे सारे काही मृगजळ आहे. शेतकऱ्यांना त्यांचा कांदा सध्या केवळ आठ-दहा रुपये किलो दराने त्यांना विकावा लागत आहे. किरकोळ बाजारात तो २० ते २२ रुपयांची विकला जातो. हाच कांदा जर एखाद्या वर्षी ५० किंवा ६० रुपयाच्या वर किलोचा भाव झाला की जणू काही आभाळ कोसळलेले आहे, अशा थाटात काळजी व्यक्त केली जाते. दर महिन्याला लाख ते दीड लाख कमावणा?या घरातील बायकाही कांद्याची दरवाढ झाली की डोळ्यात पाणी आणतात परंतु जर एखादा सिनेमा पहायचा असेल तर एका तिकिटासाठी पाचसातशे रुपये पासून दीड ते दोन हजार रुपये खर्च करतात. पण कांद्यासाठी महिन्याला शंभर दोनशे रुपये खर्च केले. तर त्यांच्या घरात सुतक आहे असे त्यांचे थोबाड करतात. सध्या जगातील दादा देश अमेरिका आहे त्याच अमेरिकेतील सरकार तेथील शेतकऱ्यांना प्रचंड मोठ्या सवलती देते. आताचे अमेरिकेतील सरकार अमेरिकेचा शेतमाल विकण्यासाठी आपल्या सरकारवर जबरदस्त दबाव आणत आहे. ज्या गोष्टी आपल्याकडे मुबलक आहेत, त्या त्यांच्याकडून आपण विकत घ्याव्यात यासाठी त्यांचे प्रयत्न चालू आहेत. जर असे झाले तर देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण किती पटीने वाढेल याचा अंदाज आता आमच्या वाचकांनीच करावा. येऊनजाऊन फक्त शेतक?यांवर संक्रात येते पण शेतकऱ्यांनी कितीही बोंबा मारल्या तरी त्याची दखल कोणतेही सरकार घेत नाही. हीच तर खरी आपल्या कृषीप्रधान देशाची आणि या देशात अन्नधान्य पिकवणाऱ्या समस्त शेतकऱ्यांची शोकांतिका आहे. राज्य करणारे शेतकरीच आहेत असेही म्हणतात, मात्र त्यांची शेती अशी काही पिकते आणि त्यांचा माल असा काही विकला जातो की त्या शेतीच्या उत्पन्नावर हे लोक लक्झरी कार घेऊन हिंडू शकतात. मोठमोठे बंगले बांधू शकतात आणि इस्रायलच्या शेतीचा अभ्यास करण्यासाठी मोठमोठे अभ्यास दौरे काढू शकतात. आपल्या मुलांना परदेशात पाठवून अत्यंत महागडे आणि वेगवेगळ्या विषयांचे शिक्षण देऊ शकतात. त्यामुळे एकदा का शेतकरी मंत्री झाला की, तो मंत्रीच असतो तो त्यावेळी शेतकरी असत नाही हेच खरे आहे. आपण फक्त 'जय जवान, जय किसान' असेच म्हणत रहावे आणि किसानाने म्हणजेच आपल्या देशातील शेतकऱ्याने मरावे, हीच त्यांची नियती आहे. पुन्हा एकदा जोराने म्हणूया, जय जवान, जय किसान!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## चंद्रपूरच्या जिवती तहसीलमधील १४ वादग्रस्त गावे

# राज्याच्या अधिकार क्षेत्रात

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :
दशकांपासून सुरू असलेल्या आंतरराज्यीय सीमा समस्येचे निराकरण करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलत, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य अधिकाऱ्यांना चंद्रपूरच्या जिवती तहसील मधील १४ वादग्रस्त गावे - ज्यावर सध्या महाराष्ट्र आणि तेलंगणा दोन्ही देशांचा दावा आहे - राज्याच्या अधिकार क्षेत्रात समाविष्ट करण्यासाठी पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत.

मुंबईतील राज्य विधिमंडळ संकुलात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हे निर्देश जारी करण्यात आले. या बैठकीत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राजुराचे आमदार देवराज भोंगळे, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा आणि बाधित गावांचे रहिवासी उपस्थित होते. अंतिम निर्णय लवकरच अपेक्षित आहे, ज्यामुळे ग्रामस्थांना दीर्घकाळापासून दिलासा मिळेल, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

अंतापूर, पद्मावती, इंदिरानगर, पळसागुडा, येसापूर, भेलापथर, लेंडीगुडा, येसापूर (नारायणगुडा), शंकरलोधी, महाराजगुडा, कोठा (बीके), परमडोली, मुकादमगुडा आणि लेंडीजला ही गावे गेल्या अनेक दशकांपासून प्रशासकीय अडचणीत आहेत.

येथील रहिवासी महाराष्ट्र आणि तेलंगणा दोन्ही निवडणुकांमध्ये मतदान करतात आणि दोन्ही राज्यांकडून नागरी सेवा घेतात. या गावांमध्ये दोन ग्रामपंचायती, दोन शाळा, दोन पाण्याच्या टाक्या आणि दोन निवडून आलेले प्रतिनिधी आहेत, असे आमदार भोंगळे म्हणाले. लोकसंख्या पूर्णपणे मराठी भाषिक आहे आणि सर्व दैनंदिन व्यवहार देखील मराठीत होतात. ही गावे महाराष्ट्राच्या महसूल हद्दीत येत असली तरी, तेलंगणाचे त्यापैकी अनेकांवर प्रशासकीय नियंत्रण आहे. ₹महाराष्ट्राने येथे रस्ते, शाळा आणि पाणीपुरवठा योजना बांधल्या आहेत, तर तेलंगणा वीज पुरवते.

सीमावर्ती परिस्थितीमुळे असंख्य प्रशासकीय आणि सामाजिक गुंतागुंत निर्माण झालेले होती. येथील बहुतेक नागरिकांकडे महाराष्ट्र आणि तेलंगणाचे दुहेरी निवडणूक कार्डच नव्हते तर रेशन आणि आरोग्य कार्ड देखील आहेत.

वीजवाहिन्या देखील दोन्ही राज्यांमधील वीज संस्थांकडून टाकल्या गेल्या आहेत. तसेच, गावांमध्ये दोन सरपंच आणि ग्रामपंचायती आहेत, जे विभाजित प्रशासकीय रचनेचे प्रतिनिधित्व करतात. शिक्षण दोन भाषांमध्ये दिले जाते - मराठी आणि तेलुगू - प्रत्येक भाषिक गटासाठी स्वतंत्र शाळा आहेत.

### मुख्यमंत्री फडणवीस यांचा मोठा निर्णय



### हरवलेल्या महिला व बालकांसाठी 'ऑपरेशन शोध'

लहान मुलांसाठी आपण ऑपरेशन मुसकान सुरू केले आहे. यात अतिशय चांगल्या पद्धतीने ४११९३ लहान मुलांचा शोध लावला. याची दखल कोर्टाने देखील घेतली. विशेषतः महिलांसाठी आपण नवीन मोहीम हाती घेतली आहे ऑपरेशन शोध. मिसिंग सेल प्रत्येक पोलिस ठाण्यात तयार करण्यात यावा. या सेलची प्रमुख एपीए लेव्हलची महिला अधिकारी असणार आहे. ऑपरेशन शोधच्या अंतर्गत १७.४.२५ ते १५.५.२५ या एक महिन्याच्या कालावधीत ४९६० हरवलेल्या महिला आणि १३६४ बालकांचा शोध आपण लावला. १०६ महिला आणि ७०३ बालक असे सापडले की जे कोणत्याच रेकॉर्डवर नव्हते, ते मिसिंग होते, पण तक्रार देखील झाली नव्हती, त्यामुळे हा एक चांगला उपक्रम पोलिसांनी चालू केला आहे. हा सुरूच ठेवणार आहोत, असे फडणवीस यांनी सांगितले.

### शरद पवारांचा निर्णय जोशींनी रद्द केला

हा वाद १२ डिसेंबर १९८९ पासून सुरू आहे, जेव्हा शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र मंत्रिमंडळाने गावे तत्कालीन अविभाजित आंध्र प्रदेशला देण्यास सहमती दर्शवली होती. तथापि, राजुराचे तीन वेळाचे आमदार वामनराव चटप यांनी विधानसभेत कायदेशीर आक्षेप घेतल्यानंतर पुढील वर्षी हा निर्णय स्थगित करण्यात आला होता. घटनेच्या कलम ३ अंतर्गत, राज्याच्या सीमा बदलण्याचा अधिकार फक्त केंद्राला आहे, असे चटप यांनी म्हटले होते. तसेच मंत्रिमंडळाचा हा निर्णय नंतर मनोहर जोशी सरकारने रद्द केला होता.

## दोन 'सेना' एकत्र

### एकनाथ शिंदे यांना आनंदराजांची साथ



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
आनंदराज आंबेडकर यांचा रिपब्लिकन सेना पक्ष आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना पक्ष यांच्या युतीची अधिकृत घोषणा आज करण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून या युतीची चर्चा होती. आज एकनाथ शिंदे आणि आनंदराज आंबेडकर यांनी एकत्र पत्रकार परिषद घेत आपल्या युतीची अधिकृत घोषणा केली. शिवशक्ती-भीमशक्ती एकत्र येत प्रबोधनकार ठाकरे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुढे नेण्याचा हा प्रयत्न असल्याचे या वेळी या दोन्ही नेत्यांनी सांगितले.

लोकांच्या भल्यासाठी आम्ही एकत्र आलो असल्याचा दावा एकनाथ शिंदे यांनी केला आहे. आमच्यात एकमेकांबद्दल विश्वास असल्याचेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. या महाराष्ट्रातील दोन सेना आहेत. शिवसेना आणि रिपब्लिकन सेना या दोन्ही रस्त्यावर अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सेना असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. यातील एक सेना बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा घेऊन चालणारी असून दुसरी सेना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रक्ताचा वारसा घेऊन चालणारी सेना असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. त्यामुळेच आमच्यात एकदम चांगले जमेल, अशा शब्दात एकनाथ शिंदे यांनी युतीची घोषणा केली आहे.

**डीसीएम म्हणजे डेडिकेटेड टू कॉमन मॅन**

या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी DCM म्हणजे डेडिकेटेड टू कॉमन मॅन अशा शब्दात आपल्या उपमुख्यमंत्री पदाचा उल्लेख केला. सर्वसामान्य माणसासोबत असलेली नाळ तुटू देता कामा नये, याचे पथ्य पाळण्याचे काम आजपर्यंत आम्ही केले असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

आनंदराज आंबेडकर हे देखील बाबासाहेब आंबेडकर यांच्या रक्ताचे वारस आहेत. बाबासाहेबांच्या घटनेमुळेच आज सर्वसामान्य माणूस सर्वोच्च पदावर पोहोचू शकला आहे. एकनाथ शिंदे देखील त्यांच्या संविधानामुळेच मुख्यमंत्री होऊ शकला असल्याचे ते म्हणाले. बाळासाहेब ठाकरे नेहमी आपल्या कार्यकर्त्यांना सवंगडी समजा, असे सांगत होते. मात्र, काही लोक कार्यकर्त्यांना घरगडी समजायला लागले होते, असा टोला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला.

## खासगी शिकवणीबाबत लवकरच अधिनियम

### शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची माहिती



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :
काही महाविद्यालये थेट खासगी शिकवणी वर्गांशी करार करून शिक्षण व्यवस्थेचा गैरवापर करत असल्याच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी खासगी शिकवणी अधिनियम तयार करण्यात येत असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी बुधवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार हिरामण खोसकर यांनी याबाबत तारांकित प्रश्न विचारला होता. त्यावेळी बोलताना भुसे म्हणाले, या अधिनियमाचा मसुदा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असून संबंधित नियमावलीची आखणी देखील सुरू आहे. या अधिनियमाच्या मसुद्याबाबत सदस्यांकडून सकारात्मक सूचना आल्यास सुचवलेल्या मुद्द्यांचा समावेश करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**बेकायदेशीर शुल्कवाढ नियमात दुरुस्ती**

राज्यातील शाळांमध्ये बेकायदेशीर शुल्कवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षण विभाग लवकरच नियमांमध्ये सुधारणा करणार आहे. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्क विनियमन अधिनियम, २०११ च्या कलम ३ नुसार कोणतीही शाळा मान्यता शुल्कापेक्षा अधिक रक्कम पालकांकडून आकारू शकत नाही. असे केल्यास संबंधित शाळेविरोधात कारवाई केली जाते, अशी माहिती दादाजी भुसे यांनी अन्य एका प्रश्नाला उत्तरात दिली. याबाबत भाजपच्या योगेश सागर यांनी प्रश्न उपस्थित केला होता.


या प्रश्नाला उत्तर देताना भुसे म्हणाले, शुल्कवाढ विरोधात पालकांकडून आलेल्या तक्रारींवर चौकशी करून त्यानुसार संबंधित शाळांविरोधात कारवाई केली जाते.

अधिनियमानुसार प्रत्येक शाळेत पालक-शिक्षक संघ स्थापन करणे बंधनकारक असून त्या संघातील कार्यकारी समितीच शुल्क वाढीबाबत निर्णय घेते. मात्र, सध्याच्या तरतुदींमध्ये काही सुधारणा आवश्यक असल्याने शिक्षण विभागाने त्याचा अभ्यास सुरू केला आहे. कोणीही गरजेपेक्षा जास्त शुल्क आकारू नये, ही सरकारची भूमिका असल्याचे भुसे यांनी सांगितले.

राज्यातील काही शाळांकडून विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, पाठ्यपुस्तके आणि शालेय साहित्य ठराविक दुकानातून किंवा विक्रेत्याकडून खरेदी करण्यास भाग पाडले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. शालेय साहित्य खरेदीबाबत लवकरच नियमावली तयार करण्यात येणार असल्याची माहिती भुसे यांनी दिली.

## जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा मिळावा

### राहुल गांधींचे मोदींना पत्र



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :
लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी जम्मू आणि काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याची मागणी केली आहे. राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींना पत्र लिहून जम्मू आणि काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा देण्यासाठी संसदेच्या येत्या पावसाळी अधिवेशनात विधेयक मांडावे, असे म्हटले आहे.

राहुल यांनी आपल्या पत्रात पंतप्रधान मोदींच्या दोन जुन्या विधानांचाही उल्लेख केला आहे. जेव्हा पंतप्रधान १९ मे २०२४ रोजी भुवनेश्वर येथे आणि १९ सप्टेंबर २०२४ रोजी श्रीनगर येथे झालेल्या रॅलीत जम्मू आणि काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याबाबत बोलले होते.

## युतीच्या चर्चा तुमच्याशी करायच्या का?

### न बोललेले शब्द तोंडात

### राज ठाकरे संतापले



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
उद्धव ठाकरे यांच्या सोबतच्या युती संदर्भात राज ठाकरे हे विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर विचार करणार असल्याचे वृत्त काही प्रसार माध्यमांनी प्रसिद्ध केले होते. मात्र अनौपचारिक गप्पांमध्ये मी असे काही बोललो नसल्याचे म्हणत राज ठाकरे यांनी प्रसार माध्यमातील पत्रकारांना खडे बोल सुनावले आहेत. हा कोणता पत्रकारितेचा प्रकार आहे? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला.

या संदर्भात राज ठाकरे यांनी एका सोशल मीडियावरील पोस्टच्या माध्यमातून अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. अनौपचारिक गप्पांमध्ये काही बोललो असेल तर ते अनौपचारिक ठेवायचे असते, एवढे साधे भान देखील नाही का? असा प्रति प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला आहे. एका नामवंत दैनिकाने देखील शहानिशा न करता अशी बातमी टाकावी? यावर देखील त्यांनी आचार्य व्यक्त केले आहे.

## लोकमान्य टिळक यांचे पणतू डॉ. दीपक टिळक यांचे निधन



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १६ :
लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे पणतू, केसरीचे विश्वस्त - संपादक तथा टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक जयंतराव टिळक (वय ७४) यांचे आज पहाटे निधन झाले.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्षही होते. त्यांच्या निधनाने शिक्षण, पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

## अकबर 'क्रूर पण सहिष्णू, औरंगजेब 'कट्टर धार्मिक'

### एनसीईआरटीच्या पुस्तकात मुघल काळाचा नवीन आढावा : ८ वीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :
अकबराचे राज्य 'क्रूरता आणि सहिष्णुतेचे मिश्रण होते, तर औरंगजेब हा एक लष्करी शासक होता ज्याने गैर-इस्लामी प्रथांवर बंदी घातली होती आणि गैर-मुस्लिमांवर कर लादले होते.' मुघल काळातील हा नवीन आढावा एनसीईआरटीच्या इयत्ता आठवीच्या पुस्तकात समाविष्ट करण्यात आला आहे.

एनसीईआरटीच्या इयत्ता ८वीच्या सामाजिक शास्त्राच्या पुस्तकात, मुघल शासकांच्या धार्मिक निर्णयांचे, सांस्कृतिक योगदानाचे आणि क्रूरतेचे एक नवीन अर्थ लावण्यात आले आहे. हे पुस्तक २०२५-२६ शैक्षणिक सत्रापासून शाळांमध्ये लागू केले जाईल. बाबरचे वर्णन लष्करी रणनीतीकार म्हणून केले जात असे

पुस्तकात मुघल सल्तनतचा पहिला शासक बाबर याचे वर्णन 'तुर्क-मंगोल शासक आणि लष्करी रणनीतीकार' असे करण्यात आले आहे. असेही सांगण्यात आले आहे की १५२६ मध्ये पानिपतच्या लढाईत बाबरने गनपावडर आणि तोफखान्यांच्या मदतीने इब्राहिम लोदीचा पराभव केला आणि दिल्ली सल्तनत संपवली.




बाबरचा मुलगा हुमायून याने साम्राज्य टिकवून ठेवण्यासाठी संघर्ष केला आणि काही काळासाठी तो शेरशाह सुरीकडून गमावला. पानिपतच्या दुसऱ्या युद्धानंतर शेरशाह सुरीचा हिंदू सेनापती हेमू याला अकबराच्या सैन्याने कसे पकडले आणि त्याचा शिरच्छेद कसा केला याचे वर्णन या पुस्तकात केले आहे.

पुस्तकात अकबराच्या राजवटीचे वर्णन क्रूरता आणि सहिष्णुतेचे मिश्रण असे केले आहे. असे लिहिले आहे की १५६८ मध्ये चित्तोड किल्ल्याच्या वेढा दरम्यान, अकबराने सुमारे ३०,००० नागरिकांना मारण्याचा आणि वाचलेल्या महिला आणि मुलांना गुलाम बनवण्याचा आदेश दिला.

याशिवाय, अकबराने जझिया कर रद्द केला, राजपूतांचे आपल्या दरबारात स्वागत केले आणि 'सुल्ह-ए-कुल' म्हणजेच सर्वांशी शांती या धोरणाला चालना दिली. त्याने फतेहपूर सिक्रीमध्ये अनुवाद विभाग स्थापन केला आणि महाभारत (ज्याला रज्मनामा म्हणतात), रामायण, भगवद्गीता आणि पंचतंत्र यासारख्या हिंदू अभिजात ग्रंथांचे फारसीमध्ये भाषांतर केले.

ही माहिती अबुल फजलच्या एका लेखात देण्यात आली होती.

## विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना निरोप

### मुख्यमंत्र्यांकडून कौतुकासह टोलेबाजी



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा आज विधानपरिषदेत निरोप समारंभ पार पडला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दानवे यांचे कौतुक केले, त्याचसोबत हलकी टोलेबाजी देखील केली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, जोपर्यंत राहुल गांधी युवा नेता राहू शकतात तोपर्यंत आपण दोघेही युवा राहू शकतो, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंबादास दानवे यांना निरोप देताना म्हटले. अंबादास दानवे यांची राजकीय सुरुवात भाजपमधूनच सुरू झाले आहे.

शिवसेनेत गेल्यानंतर त्यांनी विविध पदांवर काम केले. पत्रकारितेचा अभ्यास त्यांनी केले आहे. त्यामुळे अपेक्षा अशी होती की ते बातम्या संकलित करतील, पण ते बातम्या निर्माण करणारे झाले. एक चांगला नेता या सभागृहाला मिळाला. भाजपच्या मुशीत वाढल्यामुळे त्यांच्यात चिकाटीपणा पाहायला मिळते, संघटन कौशल्य पाहायला मिळते आणि संघटन कौशल्य पाहायला मिळते. सामन्यांच्या प्रश्नांची जाण अंबादास दानवे यांना असल्याचेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.



# विधीमंडळ अधिवेशन

## जीएसटी चुकवणाऱ्या कंपन्यांवर कारवाई



**मुंबई :** पिंपरी चिंचवड शहरात कागदपत्रांचा गैरवापर करून स्थापन केलेल्या बोगस कंपन्यांमार्फत सामान्य माणसाची फसवणूक करण्याबरोबरच जीएसटी चुकवणाऱ्या अशा कंपन्यांची राज्य सरकारच्या वस्तू आणि सेवा कर (स्टेट जीएसटी) विभाग तसेच गृह विभागामार्फत संयुक्तपणे तपासणी करून दोषी कंपन्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल अअशी माहिती अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी मंगळवारी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती. यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना जयस्वाल म्हणाले, बनावट कंपनी स्थापन करून जीएसटी बुडवण्याची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली आहे. तसेच कागदपत्रांचा गैरवापर करून स्थापन केलेल्या मे. डी. बी. इंटरप्राईजेस या कंपनीचा नोंदणी दाखला रद्द करण्यात आला आहे. या गैरव्यवहाराबाबत पोलिसात तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाची वस्तुनिष्ठ माहिती मुख्यमंत्र्यांना दिली जाईल. यानंतर याप्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असेही जयस्वाल यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्ते सिमेंट काँक्रिटीचे होणार



**मुंबई :** ग्रामीण भागात पंतप्रधान आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून रस्त्यांचे जाळे निर्माण करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील रस्ते टिकाऊ होण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून होणारे रस्ते यापुढे सिमेंट काँक्रिटीचे करण्यात येणार असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील ग्रामीण रस्त्यांबाबत अपक्ष आमदार शिवाजी पाटील यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना गोरे म्हणाले, ग्रामीण रस्त्यांची रुंदी सध्या ५, ३ आणि साडेतीन मीटर आहे. आवश्यकते प्रमाणे या रस्त्यांची रुंदी वाढविण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. तसेच जिल्हा परिषदेकडील रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरण करण्याबाबत प्रस्ताव आल्यास तो तपासून निर्णय घेण्यात येईल. राज्यात मागील काळात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत राज्याच्या इतिहासात सर्वात जास्त ग्रामीण रस्त्यांची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये ११ हजार ६९७ कामे मंजूर करण्यात आली असून लांबी ४६ हजार १०६ किलोमीटर आहे.

ग्रामीण भागात पांदण रस्ते निर्मितीसाठी ग्रामविकास विभागाच्यावतीने प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. हा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळासमोर जाणार आहे. यामधून बऱ्याच योजनाबाह्य ग्रामीण रस्त्यांची निर्मिती पांदण रस्त्यांच्या माध्यमातून होणार आहे. चंदगड विधानसभा मतदारसंघात १२० किलोमीटर लांबीचे रस्ते दुरुस्त करण्यात आले आहेत. तसेच पंतप्रधान ग्रामसडक योजनेत या भागात ५३.८६ किलोमीटर लांबीचे रस्ते मंजूर असून त्यापैकी ४५.९२ किलोमीटर लांबीचे रस्ते पूर्ण करण्यात आले आहेत. तसेच मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत १६२.९५ किलोमीटर लांबीचे रस्ते मंजूर करण्यात आले असून त्यापैकी १०६.५१ किलोमीटर लांबीचे रस्ते पूर्ण करण्यात आली आहेत, अशी माहिती गोरे यांनी यावेळी दिली.

## शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय बाजार धोरण

**मुंबई :** राज्य सरकार नेहमीच शेतकऱ्यांना केंद्र मानून त्यांच्या त्यांचे हिताच्या निर्णय घेत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला अधिक आणि चांगला बाजार भाव मिळावा यासाठी लवकरच राष्ट्रीय बाजार धोरण आणणार असल्याची घोषणा पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

भाजपचे आमदार कृष्णा खोपडे यांनी नागपूर कृषी उत्पन्न बाजार समिती मधील कामकाज प्रकरणी आज लक्षवेधी सूचना मांडली. या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेला उत्तर देताना रावल म्हणाले, नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेल्या कामकाजासंदर्भात पी. एल. खंडागळे समितीने चौकशी अहवाल सादर केला आहे. या अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांनी या बाजार समितीत झालेल्या कामकाजासंदर्भात फेरचौकशीचे आदेश दिले दिले.

दोषी असलेल्या ५१ अडत्यांपैकी तीन मृत अडते वगळून ४८ बकरा दलाल अनुज्ञाप्ती निलंबित रद्द करण्याबाबतचा खुलासा मागवला होता. त्यांच्याकडून प्राप्त झालेला खुलासा समाधानकारक नसल्याने ४८ बकरा दलालांची अनुज्ञाप्ती निलंबित करण्यात आली. सध्या हे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

# आघाडीचे अनोखे बनियन टॉवेल आंदोलन

आव्हाड, दानवे, शिंदेंसह सर्वच बडे नेते टॉवेल, बनियनवर : 'चड्डी बनियन गँग'चा निषेध

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६:** राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा सध्या अंतिम आठवडा सुरू आहे. या आठवड्याच्या तिसऱ्या दिवशी महाविकास आघाडीच्या आमदारांनी बुधवारी थेट बनियन व टॉवेल घालून विधान भवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले.

यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेविरोधात 'महाराष्ट्राची लूट करणाऱ्या चड्डी बनियन गँगचा निषेध असो'च्या घोषणा दिल्या. त्यांच्या या अनोख्या आंदोलनाची विधान भवन परिसरात खमंग चर्चा सुरू होती.

सत्ताधारी शिवसेनेचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी गत आठवड्यात अंगावर बनियन व टॉवेल असल्याच्या स्थितीत आमदार निवासातील कॅन्टीनमध्ये जाऊन तेथील एका कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. त्यांनी सदर कर्मचाऱ्यावर शिळे अन्न दिल्याचा आरोप केला होता. या प्रकरणी शिवसेनेला चौफेर टीकेचा सामना करावा लागला होता.

त्यानंतर राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांचा बेडरूममधील एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यात ते बनियन व चड्डीवर दिसून आले होते. त्यांच्या शेजारी पैशांची बॅगही दिसून आली होती. या पार्श्वभूमीवर विरोधकांनी आजचे अनोखे आंदोलन केले आहे.

यावेळी विरोधकांनी ४० खोके एकदम ओके, महाराष्ट्राची लूट करणाऱ्या चड्डी बनियन गँगचा निषेध असो अशी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास



दानवेकाँग्रेस नेते सतेज पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे व आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासह सर्वच नेत्यांनी बनियन व चड्डी घातली होती. त्यांच्याकडे सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना या नेत्यांनी महायुती सरकारवर सडकून टीका केली.

यावेळी अंबादास दानवे म्हणाले, ५० खोके एकदम ओके यांच्यासाठीच आम्ही ही घोषणाबाजी केली. हे लोक सरकारच्या तिजोरीवर दरोडा टाकत आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीने आज ही चड्डी बनियन गँग व तिला पाठिंबा देणाऱ्या मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याविरोधात आंदोलन केले.

सरकारचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांनी या लोकांना आवर घातला असता तर हे निश्चितपणे थांबले असेल. पण त्यांचे दररोज मोठमोठे पराक्रम बाहेर येत आहेत. त्यामुळे आम्ही त्यांच्या निषेधार्थ बनियन व टॉवेल घालून आंदोलन केले.

काँग्रेस नेते सतेज पाटील म्हणाले, पार्टी विथ डिफरंस अशी भाजपची स्वतःची भूमिका आहे. पण आज पैशाची बॅग एका मंत्र्याच्या खोलित दिसते. पण त्याच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. स्वतः पोलिसांनी दखल घेऊन गुन्हा दाखल केला होता. ही बॅग पैशाची होती की कपड्यांची होती याचा तपास केला पाहिजे.

माझ्या मते, गृहखात्याने या प्रकरणी सूमोटोने कारवाई केली पाहिजे. या मंत्र्याला बोलावून त्याचा जबाब घेतला पाहिजे. त्यांनी ही बॅग कपड्यांची असल्याचा दावा केला असेल तर त्यांना क्लीनचिट द्या. पण ती पैशांची असेल तर त्यांच्यावर कारवाई कारवाई. या प्रकरणी महाराष्ट्रात संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. याचा अर्थ या सगळ्या गैरकृत्याला सरकार पाठिशी घालत आहे. त्याचा निषेध म्हणून आम्ही हे आंदोलन केले आहे, असे ते म्हणाले.

### सरकार आपल्या बापाचे असल्यासारखे वर्तन : शिंदे

शशिकांत शिंदे म्हणाले, महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांपासून राजकारणाची एक परंपरा व उच्च प्रकारचा एक दर्जा राखला जातो. पण गत काही वर्षांपासून या महाराष्ट्रात कायद्याची भीती, सरकारचा धाक राहिला नाही. सरकारमधीलच लोकप्रतिनिधी अशा पद्धतीने वागायला लागले की, ते स्वतःच कायदा हातात घेतात. गरिबांना मारहाण करतात. भ्रष्टाचारही मोठ्या प्रमाणात करतात. यामुळे जनतेमध्ये या लोकप्रतिनिधींविरोधात तीव्र नापसंती निर्माण झाली आहे. या सर्वांचा निषेध करण्यासाठी आम्ही विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. आमच्या या आंदोलनानंतर त्यांना सबुद्धी सुचावी, निदान संस्कृती व सुसंकृतपणा यावा अशी अपेक्षा आहे. हे लोक सरकार आपल्या बापाचे आहे असे समजून वागत आहेत. जनतेला त्यांचा हा प्रकार दिसावा म्हणून आम्ही हे आंदोलन केले आहे.

# पक्ष जी जबाबदारी देईल ती आनंदाने स्वीकारणार

खांदेपालटानंतर रोहित पवार यांची पहिली प्रतिक्रिया



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६:** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने खांदेपालट झाल्यानंतर पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. पक्षातील नेते माझ्यावर जी जबाबदारी सोपवतील ती जबाबदारी स्वीकारण्यास आपण तयार असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

इतकेच नाही तर प्रदेशाध्यक्ष पदासाठी रोहित पवार यांच्या नावाची चर्चा होती का? या प्रश्नाला देखील त्यांनी उत्तर दिले आहे. माझ्या नावाची कोणती चर्चा नव्हती. मी या पदासाठी इच्छुक नव्हतोच, असा दावा देखील त्यांनी केला आहे.

प्रसार माध्यमांशी बोलताना रोहित पवार म्हणाले की, पक्षातील अनेक मोठे नेते, ज्यांनी सरकार आणि पक्ष चालवलेला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जो बदल होईल, तो पक्षातील कार्यकर्त्याला आणि पदाधिकाऱ्याला स्वीकारावा लागणार आहे.

कालच सर्वांनी मिळून महाराष्ट्राच्या सर्व कार्यकारिणीने शशिकांत शिंदे यांना प्रदेशाध्यक्ष म्हणून निवडले आहे. ते चांगले काम करतील, असा आम्हाला विश्वास आहे. जयंत पाटील यांनी गेल्या सात वर्षात प्रदेशाध्यक्ष म्हणून डोळ्यात तेल घालून पक्ष चालवला. त्यांनी केलेले काम, कष्ट लक्षात ठेवून शशिकांत शिंदे देखील चांगले काम करतील, असा आम्हाला विश्वास असल्याचे रोहत पवार यांनी म्हटले आहे.

पक्षाचा कार्यकर्ता म्हणून वरिष्ठ नेते जी जबाबदारी देतील, ती सांभाळणे माझं कर्तव्य असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे. जयंत पाटील यांनी राजीनामा दिल्यानंतर प्रदेशाध्यक्ष पदासाठी माझ्या नावाची कोणतीच चर्चा नव्हती. किंवा त्यासाठी मी इच्छुक देखील नव्हतो. आम्ही सर्वजण एकत्र मिळून काम करत असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे. देश, पार्टी, संघटना ज्या वेळी अडचणीच्या काळातून जात असते, तेव्हा सर्वांनी एकत्र येऊन काम करायचे असते. याच विचारातून आपण सर्वजण काम करत असतो, असे देखील ते म्हणाले.

आज लोकांच्या मनामध्ये खदखद आहे. त्या खदखदीला अजून ताकद देऊन त्यांच्या अडचणी कशा सोडवायच्या? लोकांच्या मनातील खदखद विधिमंडळात कशा मांडायच्या? पक्षाच्या माध्यमातून लोकांच्या अडचणी सरकारवर दबाव टाकून कशा सोडवायच्या? यासाठी पक्ष जी जबाबदारी देईल, ती स्वीकारणार असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे. जे पद दिले जाईल, त्या कामाला नक्कीच न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

# भाकरी फिरवून काय उपयोग, पीठ तर तेच आहे...

## राष्ट्रवादीतील बदलावर कार्यकर्त्यांचे मत

■ **दीपक कैतके, मुंबई, दि. १६:** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात मोठा बदल झाला असला, तरी हा बदल खरंच पक्षाला तारक ठरेल का? असा सवाल कार्यकर्त्यांमध्ये उपस्थित झाला आहे.

जयंत पाटील यांच्या राजीनाम्यानंतर शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. मात्र कार्यकर्त्यांचे स्पष्ट म्हणणे आहे की, भाकरी फिरवून काय उपयोग, जेव्हा पीठच तेच आहे?

पक्षातील वाढत्या दुफळी, मोठ्या प्रमाणातील गळती आणि नेतृत्वातील अविश्वास या पार्श्वभूमीवर मंगळवारी पार पडलेल्या बैठकीत जयंत पाटील यांनीच शिंदे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला आणि तो मंजूरही झाला. पण पक्षातील नाराजी अद्याप शमलेली नाही, हेही स्पष्ट दिसते.

शशिकांत शिंदे हे शरद पवारांचे जुने आणि विश्वासू सहकारी. राष्ट्रवादीच्या स्थापनेपासूनच ते शरद पवारांसोबत आहेत. फुटीनंतरही त्यांनी निष्ठा राखली. संघटनात्मक कौशल्य, पश्चिम महाराष्ट्रातील प्रभावी पकड आणि मजबूत संपर्क जाळे यामुळे शरद पवारांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले जाते.

मात्र, भाजपने पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना उबाठा गट अशा सर्वच पक्षांतून मोठी फोड केली आहे. या गळतीवर शिंदे कसे नियंत्रण ठेवणार, हा खरा प्रश्न आहे.

पक्षातील अनेकजण म्हणतात, नावे बदलली, चेहरे बदलले, पण विचार, कार्यशैली आणि निर्णयक्षमतेत बदल नसेल तर या बदलाला अर्थ काय? आगामी निवडणुकांसाठी हा बदल प्रभावी ठरेल की ह्यपीठ तेच, भाकरी फिरवली असेच कार्यकर्त्यांना वाटेल, हे येणारा काळच ठरवेल.

## भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई कधी होणार?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६:** अनियमितता वेगळा आहे आणि भ्रष्टाचार



आहे. भ्रष्टाचाराची चौकशी व्हावी. आमचा आरोपच नाही अनियमिततेची. आम्ही म्हणतोय भ्रष्टाचार झाला आहे. आम्ही यावर तक्रार देखील केली आहे. भ्रष्टाचाराच्या ज्या तक्रारी आहेत त्याला अनियमीततेचे स्वरूप देण्यात येत आहे. आम्ही जी भ्रष्टाचाराची प्रकरणे आपल्याकडे दिली आहेत, त्यावर कारवाई काय करणार आणि किती दिवसात करणार? अशी प्रश्नांची सरबत्ती उबाठा गटाचे आमदार अनिल परब यांनी केली.

यावर उत्तर देताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की ज्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला आहे त्याला बडतर्फ करण्यात येईल. यावर मुख्यमंत्र्यांनी स्पीकिंग ऑर्डरच्या सूचना दिल्या.

# शुभांशूने रचला इतिहास



आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातील (आयएसएस ) १८ दिवसांच्या वास्तवानंतर आणि २२.५ तासांच्या प्रवासानंतर भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला ऑक्सिऑम ४ मोहिमेतील आपल्या तीन सहकाऱ्यांसह मंगळवारी पृथ्वीवर सुरक्षित परतले आणि इतिहास घडला.

शुभांशू शुक्ला पृथ्वीवर परतताच त्याच्या कुटुंबासह संपूर्ण देशात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. शुभांशू शुक्ला पृथ्वीवर परतण्याचा क्षण देशवासीयांसाठी अभिमानाचा क्षण होता. शुभांशू शुक्ला आपली मोहीम फत्ते करून पृथ्वीवर परत आले हा क्षण १४० कोटी भारतीयांनी आपल्या मनात साठवून ठेवला.

शुभांशू शुक्ला सुरक्षित परत आल्याने १४४ कोटी भारतीयांना ' अंतराळ ठेंगणे झाले' असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शुभांशू हे भारताचे दुसरेच अंतराळवीर आहेत. या आधी विंग कमांडर राकेश शर्मा यांनी ४१ वर्षापूर्वी अंतराळाला गवसणी घातली होती त्यानंतर आता तशी कामगिरी करणारा शुभांशू हा पहिलाच आणि देशातील केवळ दुसरा अंतराळवीर ठरला आहे.

भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला २५ जून रोजी ऑक्सिऑम मिशन ४ अंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे रवाना झाले होते. शुभांशू शुक्ला हे या मोहिमेचे पायलट होते. भारतीय वेळेनुसार दुपारी २५ जून रोजी दुपारी १२ वाजता फ्लोरिडा येथील नासाच्या केनेडी स्पेस सेंटरवरून हे मिशन लाँच करण्यात आले होते.

सर्व अंतराळवीरांनी स्पेसएक्सच्या फाल्कन-९ रॉकेटशी जोडलेल्या ड्रॅगन कॅप्सूलमध्ये उड्डाण केले. ड्रॅगन अंतराळयान २६ जून रोजी दुपारी ४.३० वाजता सुमारे २८.५ तासांनंतर आयएसएसशी जोडले गेले

अमेरिकन अंतराळ संस्था नासा आणि भारतीय एजन्सी इस्रो यांच्यातील करारानुसार, भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांची या मोहिमेसाठी निवड करण्यात आली होती.

**मोहिमेचे उद्दिष्ट**

ऑक्सिऑम ४ या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट अंतराळात संशोधन करणे आणि नवीन तंत्रज्ञानाची चाचणी करणे हे होते. हे अभियान खाजगी अंतराळ प्रवासाला प्रोत्साहन देणारे देखील होते आणि भविष्यात व्यावसायिक अंतराळ स्थानक ( ऑक्सिऑम स्टेशन) बांधण्याची योजना असलेल्या ऑक्शन स्पेस प्लॅनिंगचा एक भाग होता.

**वैज्ञानिक प्रयोग:** सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात विविध प्रयोग करणे.

**तंत्रज्ञान चाचणी:** अवकाशात नवीन तंत्रज्ञानाची चाचणी आणि विकास.

**आंतरराष्ट्रीय सहकार्य :** विविध देशांतील अंतराळवीरांना व्यासपीठ प्रदान करणे.

**शैक्षणिक उपक्रम:** अवकाशातून पृथ्वीवरील लोकांना प्रेरणा देणे आणि जागरूकता पसरवणे.

**शुभांश यांनी आयएसएसवर काय केले?**

शुभांशू १४ दिवस तिथे राहिले आणि त्यांनी ७ प्रयोग केले, जे भारतीय शैक्षणिक संस्थांनी तयार केले आहेत. यापैकी बहुतेक जैविक अभ्यास आहेत, जसे की अंतराळातील मानवी आरोग्यावर आणि जीवांवर होणारा परिणाम पाहणे. याशिवाय, त्यांनी नासासोबत आणखी ५ प्रयोग केले, जे दीर्घ अंतराळ मोहिमांसाठी डेटा गोळा करणारे आहेत.

या मोहिमेत केलेले प्रयोग भारताच्या गगनयान मोहिमेला बळकटी देणारे ठरतील. शुभांशूचा हा अनुभव २०२७ साली नियोजित असलेल्या गगनयान मोहिमेसाठी उपयुक्त ठरेल. त्यांनी आणलेला डेटा आणि अनुभव भारताच्या अंतराळ कार्यक्रमास पुढे नेण्यास मदत करू शकेल.

■ ■ ■

**शुभांशू शुक्ला कोण आहेत ?**

शुभांशू यांचा जन्म १९८६ मध्ये उत्तर प्रदेशातील लखनौ येथे झाला. त्यांनी राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) मधून शिक्षण घेतले. ते २००६ मध्ये हवाई दलात सामील झाले आणि लढाऊ विमाने उडवण्याचा अनुभव आहे. त्यांची निवड इस्त्रोच्या गगनयान मोहिमेसाठीही झाली आहे, जी भारताची पहिली मानवी अंतराळ मोहीम आहे. अंतराळवीर होण्यासाठी त्यांनी रशिया आणि अमेरिकेत विशेष प्रशिक्षण घेतले. यामध्ये त्यांनी सूक्ष्म गुरुत्वाकर्षण, आपत्कालीन हाताळणी आणि वैज्ञानिक प्रयोगांमध्ये काम करायला शिकले.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

# महाराष्ट्रातील बडे अधिकारी हनीट्रॅपच्या जाळ्यात

विधानसभेत उपस्थित झाला मुद्दा ■ सरकारकडे स्पष्टीकरणाची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६:** राज्यातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना हनीट्रॅपमध्ये अडकवून त्यांच्याकडून खंडणी उकळण्याच्या घटनेमुळे सध्या महाराष्ट्राच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ माजली आहे.

काँग्रेस नेते नाना पटोले यांनी बुधवारी औचित्याच्या मुद्याद्वारे हा विषय विधानसभेच्या पटलावर मांडला. तसेच सरकारकडे स्पष्टीकरणही मागितले. त्यावर विधानसभा अध्यक्षांनी सरकारला या प्रकरणी योग्य ती दखल घेण्याचे निर्देश दिले.

नाना पटोले म्हणाले की, राज्यात एक अतिशय महत्वपूर्ण बाब पुढे येत आहे. हनीट्रॅपच्या माध्यमातून आपल्या राज्यातले गोपनीय दस्तऐवज काही लोकांना मिळत आहेत. या प्रकरणात राज्यातील वरिष्ठ अधिकारी, आयएएस अधिकारी व काही मंत्री यात समाविष्ट आहेत अशी चर्चा सुरू आहे. राज्यातील गोपनीय दस्तऐवज बाहेर जातील असा हनीट्रॅप लावला गेला आहे. त्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

मी ही महत्वपूर्ण बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देणे माझे कर्तव्य समजतो. या हनीट्रॅपच्या माध्यमातून गोपनीय कागद समाजविघातक संघटनांकडे गेले तर राज्यासह संपूर्ण व्यवस्थेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे.

या प्रकरणी राज्यात काय सुरू आहे? याची वस्तुस्थिती सायंकाळपर्यंत सरकारने सभागृहापुढे स्पष्ट करावी. या ठिकाणी आपण आमचे पालक आहेत. तुम्ही ही माहिती सरकारकडून मागवून सभागृहाला कळवली पाहिजे, असे नाना पटोले विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना उद्देशून म्हणाले. त्यावर अध्यक्षांनी शासनाला याची योग्य ती दखल घेण्याचे निर्देश दिले.



'इंडिया टुडे'च्या वृत्तानुसार, महाराष्ट्रातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना हनीट्रॅपच्या जाळ्यात ओढून त्यांच्याकडून खंडणी वसूल करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप एका महिलेवर होत आहे. विशेष म्हणजे २०१६ साली एका खंडणी प्रकरणात या महिलेला अटक झाली होती.

सदर महिला स्वतःला गरजू असल्याचे भासवून आयपीएस व विविध विभागांतील सनदी अधिकारी, मुख्याध्यापक आदी उच्चपदस्थांशी संपर्क साधायची. त्यांना आपल्या जाळ्यात ओढायची. त्यानंतर खंडणी उकळण्यासाठी त्यांच्यावर खोटे आरोप करायची.

सत्र न्यायालय व मुंबई उच्च न्यायालयात सादर केलेल्या कागदपत्रांनुसार, सदर महिलेने यापूर्वी अनेक अधिकाऱ्यांवर बलात्काराचे आरोप केलेत. पण नंतर परस्पर सहमतीने ते आरोप मागे घेतले. या प्रकरणी लोकलाज व करिअरचे नुकसान टाळण्यासाठी अधिकाऱ्यांनी मौन राहणेच पसंत केले आहे.

'इंडिया टुडे'ने आपल्या वृत्तात आरोपी महिलेच्या गुन्ह्याची पद्धतही नमूद करण्यात आली आहे. त्यानुसार, सदर महिला विधवा किंवा गरीब असल्याचे भासवून अधिकाऱ्यांच्या संपर्कात येत असे.

त्यानंतर सुरूवातीला व्हॉट्सअप संभाषण, नंतर व्हिडीओ कॉल व अखेर वैयक्तिक भेटीतून अधिकाऱ्यांचा विश्वास संपादित करत होती. प्रत्यक्ष भेटीत ही महिला छुप्या पद्धतीने खासगी क्षणाचे फोटो व व्हिडीओ काढत होती.

त्यानंतर त्याचा वापर खंडणी उकळण्यासाठी करत होती. या महिलेने मुंबई, ठाणे, पुणे व नाशिक येथील अधिकाऱ्यांना आपल्या जाळ्यात ओढल्याचा दावा केला जात आहे. २०१६ साली खंडणी प्रकरणात कारवाई झाल्यानंतर या महिलेने नवी ओळख धारण करून आपले कृत्य सुरू ठेवल्याचे सांगितले जात आहे.

# शेवटचे संभाषण बदलू शकते थेअरी

१२ जून रोजी अहमदाबादमध्ये उड्डाणानंतर ३२ सेकंदात कोसळलेल्या एअर इंडियाच्या बोईंग एआय-१७१ विमानाचा प्राथमिक तपास अहवाल सार्वजनिक झाला असेल, परंतु त्याच्या निकालांमुळे अनेक तीव्र प्रश्न उपस्थित झाले आहेत. अशा परिस्थितीत, एव्हिएशन अपघात तपास ब्युरो त्याच्या अंतिम अहवालाबाबत अधिक सावधगिरी बाळगत आहे.

---------------




तपास आता अशा ६ तांत्रिक आणि प्रक्रियात्मक मुद्द्यांवर केंद्रित आहे, ज्यामध्ये कोणताही एक घटक संपूर्ण अपघाताचे स्वरूप बदलू शकतो. खरं तर, सुरुवातीच्या अहवालात, दोन्ही इंजिनांचे इंधन नियंत्रण स्विच 'रन' वरून 'कटऑफ' स्थितीत जाणे हे अपघाताचे मुख्य कारण मानले गेले आहे.

परंतु अहवालात हे स्विच पायलटने चालू केले होते की काही इलेक्ट्रोमेकॅनिकल बिघाडामुळे झाले हे उघड झालेले नाही. जर पायलटने स्विच चालू केला असता, तर दोन्ही पायलटमधील संभाषण कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झाले असते.

या प्रश्नामुळे तपास सहा 'ब्लाइंड स्पॉट्स'कडे वळला आहे. एएआयबीच्या सूत्रांनुसार, या सहा ब्लाइंड स्पॉट्सपैकी प्रत्येकाचे डेटा-कलेक्शन, विश्लेषण आणि क्रॉस-सिंक्रोनायझेशन अंतिम अहवालाचा आधार बनेल. १२ जून रोजी झालेल्या विमान अपघातात २७० लोकांचा मृत्यू झाला.

**६ ब्लाइंड स्पॉट्स :**

**१. इंधन स्विच : कटऑफ कमांड कसे देण्यात आले?**

इंधन पुरवठा करण्यासाठी (रन) किंवा कट ऑफ (कट ऑफ) करण्यासाठी, कट ऑफ कमांड इलेक्ट्रॉनिक बिघाडामुळे किंवा पायलटच्या इनपुटमुळे झाला आहे का हे निर्धारित करण्यासाठी ळ्उइ (थ्रॉटल कंट्रोल बॉक्स) युनिटची डुप्लिकेट चाचणी केली जाऊ शकते.

**२. वैमानिकांच्या शेवटच्या संपर्काची वेळ तपासणे आवश्यक**

सीव्हीआरमध्ये रेकॉर्ड केलेल्या संवादावरून असे दिसून येते की वैमानिकांमध्ये इंधन स्विचबद्दल संभाषण झाले होते. एका वैमानिकाने विचारले होते की 'तुम्ही इंधन का बंद केले?' दुसऱ्याने म्हटले - 'मी केले नाही'. हे समजून घेण्यासाठी, सीव्हीआर आणि एफडीआर (फ्लाइट डेटा रेकॉर्डर) ची टाइमलाइन सारखी असणे आवश्यक आहे.

**३. कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डरमधील स्विचचा आवाज येतो का?**

जेव्हा इंधन नियंत्रण स्विच फिरवला जातो तेव्हा एक क्लिकिंग आवाज येतो जो उश्फ (कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर) च्या एरिया माइकमध्ये रेकॉर्ड केला जातो. जर आवाज रेकॉर्ड केला नसेल तर ते मॅन्युअली केले गेले नसल्याचे सूचित करते.

**४. एफएए सल्लागाराचे पालन केले गेले की नाही?**

फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशनने २०१८ मध्ये इंधन स्विच लॉकिंग यंत्रणेबाबत एक सल्लागार जारी केला होता. तपास संस्थेने उक्कउअ कडून देखभाल रेकॉर्ड, सेवा बुलेटिन लॉग, क्लिअरन्स प्रती मागवल्या आहेत. याकडे दुर्लक्ष करणे गंभीर ऑपरेशनल निष्काळजीपणा ठरेल.

**५. इंजिन व्हॉल्व्ह कधी उघडले आणि कधी बंद झाले हे देखील तपासणे आवश्यक आहे.**

इंजिनमधील व्हॉल्व्ह कधी उघडले आणि बंद झाले, कोणत्या सेन्सरने कोणता सिग्नल दिला. सुरुवातीच्या अहवालात याचा उल्लेख नाही. सूत्रांचे म्हणणे आहे की अअक्ष ने ऋॠ आणि बोईंगकडून या चॅनेल्सचा कच्चा डेटा मागितला आहे. ते विश्लेषणासाठी तो बंगळुरूला पाठवतील.

**६. पायलटचा प्रतिसाद एसओपी अंतर्गत व्यावहारिक होता का?**

मानक कार्यप्रणालीनुसार ३२ सेकंदात इंजिन पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला पाहिजे होता का? की इतक्या कमी वेळात ते अशक्य होते? यासाठी एक सिम्युलेटेड कॉकपिट रिक्रिएशन (सिम चेक) केले जाईल.

अहमदाबाद विमान अपघातावर आंतरराष्ट्रीय पायलट ऑर्गनायझेशनने म्हटले आहे की तपास अद्याप सुरुवातीच्या टप्प्यात आहे, त्यामुळे मीडिया किंवा सोशल मीडियावर घाईघाईने कोणतेही निष्कर्ष काढणे योग्य नाही.

पीडितांना (वैमानिक, क्रू मेंबर्स आणि प्रवाशांचे कुटुंब) आदराने आणि व्यावसायिकतेने वागवले पाहिजे. नियमांनुसार आवश्यकतेनुसार हा अहवाल ३० दिवसांच्या आत तयार करण्यात आला आहे. अहवालात अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत, परंतु अद्याप उत्तरे सापडलेली नाहीत.

वैमानिकाच्या देहबोलीचे, हाताच्या हावभावांचे किंवा सह-वैमानिकाच्या प्रतिक्रियांचे व्हिडिओ रेकॉर्ड करत नाही. म्हणून, पुढील पिढीतील ब्लॅक बॉक्स तंत्रज्ञानाचा विचार केला जात आहे. ते कॉकपिटचा व्हिडिओ देखील रेकॉर्ड करू शकते.

याशिवाय, ब्लॅक बॉक्स खराब झाला तरीही डेटा ऑनलाइन सुरक्षित राहावा यासाठी क्लाउड बॅकअप सिस्टम असेल. दोष आपोआप ओळखण्यासाठी आणि अलर्ट पाठवण्यासाठी एआय आधारित वॉर्निंग सिस्टम असेल.

# बालकामगारांची परिस्थिती आणि भवितव्य

संयुक्त राष्ट्र संघाच्या आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या( आय एल ओ) म्हणण्यानुसार १४ वर्षाखालील जी मुले स्वतःच्या आणि परिवाराच्या उदरनिर्वाहासाठी मोल मजुरी तसेच मेहनतीची कामे करून उदरनिर्वाह करतात त्यांना बालकामगार असे म्हटले आहे. बाल कामगारिता सामाजिक कलंक आहे. बाल कामगारिता प्रामुख्याने गरीब देशांमध्ये ठळकपणे आढळून येते.

विकसनशील देशाच्या यादीत असलेल्या भारताची ही समस्या आजही कायम आहे. वेगवान आर्थिक प्रगती करणाऱ्या भारताला बाल कामगारितेवर विशेष लक्ष देणे क्रमप्राप्त ठरते. भारतात बालकामगार विरोधी कायदे झाले असले तरी बालमजूरांच्या संख्येत घट न होता ती कायमच दिसते.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९९३०८३५४५८

याचे मूळ कारण आर्थिक व सामाजिक परिस्थिती होय. आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी महानगरात ट्रॅफिक सिग्नल जवळ काही वस्तू विकणारी मुले,हॉटेल बसस्थानके, रेल्वे स्टेशन, पाणी खाद्यपदार्थाची विक्री करणारी मुले, खानावळीमध्ये टेबल साफ करणारी, शहरात कचरा वेचणारी, तर ग्रामीण भागात वीटभट्टीवर काम करणारी, शेतीत राबणारी या आणि अशा अनेक ठिकाणी लहान मुले मजुरी करताना दिसतात.

काही सामाजिक संस्था कार्यकर्त्यांनी तक्रार केली असता अशा ठिकाणी धाडी पडतात.पण काही दिवसांनी परिस्थिती जैसे थे कायम असते. अशांनी हे समस्या मुळात मिटणारी नसून त्याचे खरे मूळ समाजाच्या आर्थिक परिस्थिती मध्ये दडलेले आहे. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खालावल्यामुळे बालकांच्या बौद्धिक, शारीरिक, विकासाच्या काळात अंग मेहनत करावी लागते हे समाजाच्या असमतोलपणाचे लक्षण होय.

अशा बालमजुरी करणाऱ्या पालकांशी संवाद साधला असता असे निदर्शनास येते की, त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती हलाखीची आहे. स्थलांतरित कुटुंबातीलचं मुले प्रामुख्याने बालमजूरीकडे वळलेली दिसतात. 'कमावते हात कमी आणि खाणारी तोंडे जास्त 'त्यामुळे मुलांना कामावर पाठविण्याशिवाय गत्यंतर नाही असे दबक्या आवाजात बोलले जाते.

अनेक बालकांचे पालक व्यसनाधीन आहे त्यामुळे आपल्या पाल्यांच्या बौद्धिक, शैक्षणिक, सामाजिक परिस्थिती संभाव्य सुधारणा होणे होण्याची शक्यता धूसर असते.बालमन लवचिक असते. त्यांना आपल्या हक्कांची आणि कायद्यांची जाणीव नसल्यामुळे नकळत बालके कामात गुंतली जातात.

अल्प मोबदल्यात अधिक काम करून घेणाऱ्यांची मानसिकता समाजात वाढताना दिसून येते. याकडे दुर्लक्ष होता कामा नये. कायद्यांचा कुठलाही जरब नसल्यामुळे बालकांना वेठबिगारी कामात गुंतवणाऱ्या टोळ्या मात्र निर्माण व्हायला नको!

परिणामी अशा बालकामगारांना अनेकदा लैंगिक शोषणाला सामोरे जावे लागल्याची अगणित प्रकरणे पुढे आलेली आहेत. सतत स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील मुली कामासाठी बाहेर पडतात आणि अधिक कामाच्या मोबदल्यापाई कामावर ठेवली जातात.

विकृत समाजाच्या मानसिकतेची वक्रदृष्टी त्यांच्यावर पडते. तिथे त्यांचे लैंगिक शोषणास प्रारंभ होतो.बहुतेक मुली ह्या परिस्थितीमुळे वेश्या व्यवसायाकडे लोटल्या गेल्या आहेत. एवढेच नव्हे तर अनेकांची विक्री सुद्धा होते. धर्मांतरण, फूस लावून पळून नेणे अशी प्रकरणे अलीकडच्या काळात आढळून आली आहे.

अनेक बालकांच्या कोवळ्या मनाचा फायदा घेऊन भीक मागण्यास प्रवृत्त केले जाते. तर काहींची वाटचाल अत्यंत धोकादायक अशा गुन्हेगारी प्रवृत्तीकडे होत असते. सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत खितपत पडलेले कुठल्या वळणावर जातात हे बघण्याचे नैतिक कर्तव्य शासन, प्रशासन, सुज्ञ समाजभान ठेवणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांवर येऊन ठेपलेली आहे.


■ ■ ■

# ' जेव्हा मी जात चोरली'

**'जेव्हा मी जात चोरली' (जेव्हा मी माझी जात लपवली होती) या कवितासंग्रहाने एका कच्च्या समाजाचे उत्कट चित्रण करून मराठी साहित्यात खळबळ उडवून दिली आणि त्यामुळे आधुनिक मराठी साहित्याला मराठीत नवीन गती मिळाली. आज अनेक समीक्षक या कथांना दलितांचे महाकाव्य म्हणून पाहतात आणि नंतर अभिनेता-दिग्दर्शक विनय आपटे यांनी त्यावर चित्रपट बनवला.**

------------

बाबुराव रामजी बागुल (१९३०-२००८) हे मराठीतील आधुनिक साहित्याचे प्रणेते आणि २० व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय लघुकथेतील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्व होते, जेव्हा त्यांच्यासारख्या दलित लेखकांच्या आगमनाने भूतकाळापासून आमूलाग्र विचलन अनुभवले.



बाबुराव रामाजी बागुल यांचा जन्म १७ जुलै १९३० रोजी विहीतगाव, जि . नाशिक येथे झाला. हायस्कूल शिक्षणानंतर त्यांनी १९६८ पर्यंत विविध हाताने कामे केली. हे करत असताना त्यांनी मासिकांमध्ये अनेक कथा प्रकाशित केल्या, ज्या मराठी वाचकांचे लक्ष वेधून घेऊ लागल्या. अखेर १९६३ मध्ये त्यांचा पहिला कथासंग्रह ' जेव्हा मी जात चोरली' (जेव्हा मी माझी जात लपवली होती) आला.

याने एका कच्च्या समाजाचे उत्कट चित्रण करून मराठी साहित्यात खळबळ उडवून दिली आणि त्यामुळे आधुनिक मराठी साहित्याला मराठीत नवीन गती मिळाली; आज अनेक समीक्षक या कथांना दलितांचे महाकाव्य म्हणून पाहतात आणि नंतर अभिनेता-दिग्दर्शक विनय आपटे यांनी त्यावर चित्रपट बनवला.

त्यानंतर त्यांनी 'आकार' (१९६७) हा कवितासंग्रह प्रकाशित केला , ज्याने त्यांना तात्काळ प्रसिद्धी दिली, परंतु हा त्यांचा दुसरा लघुकथासंग्रह 'मारन स्वस्त होत आहे' (१९६९) होता, ज्याने त्यांच्या पिढीतील एक महत्त्वाचा प्रबुद्ध आवाज म्हणून त्यांचे स्थान मजबूत केले. हा संग्रह आता भारतातील दलित लेखनात एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो आणि १९७० मध्ये त्यांना महाराष्ट्र सरकारने 'हरिनारायण आपटे पुरस्कार' प्रदान केला.

बागुल हे आंबेडकरवादी बौद्ध होते. १९६८ नंतर, ते महाराष्ट्रातील उपेक्षित दलित लोकांच्या जीवनाशी संबंधित साहित्याचे पूर्णवेळ लेखक बनले. त्यांच्या काल्पनिक लेखनात त्या वर्गाच्या लोकांच्या जीवनाचे चित्रमय वर्णन दिले गेले. बी. आर. आंबेडकर, ज्योतिबा फुले आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारांचा बागुल यांच्या मनावर प्रभाव पडला. ते लवकरच दलित चळवळीचे एक महत्त्वाचे मूलगामी विचारवंत बनले आणि १९७२ मध्ये त्यांनी एक प्रमुख विचारवंत, पँथरचा जाहीरनामा प्रकाशित केला. त्याच वर्षी त्यांनी महाड येथे झालेल्या 'आधुनिक साहित्य संमेलनाचे' अध्यक्षपद भूषवले. गेल्या काही वर्षांत त्यांच्या कथांनी भविष्यातील दलित लेखकांना त्यांच्या आत्मचरित्रात्मक कथांना सर्जनशील रूप देण्यास शिकवले.

त्यानंतर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने मराठी साहित्यातील त्यांच्या योगदानाची दखल घेऊन, नवोदित लघुकथा लेखकाच्या पदार्पणाच्या कामाला दरवर्षी दिला जाणारा बाबुराव बागुल गौरव पुरस्कार सुरू केला.

जेव्हा मी जात चोरली होती... मरण स्वस्त होत आहे... सूड... दलित साहित्य आजचे क्रांतीविज्ञान, आंबेडकर भारत, अघोरी, पाषाण, अपूवा, कोंडी, पावशा, भूमिहीन, मूकनायक, सरदार, वेदाधी तू होतास, दलित साहित्य : आजचे क्रांतीविज्ञान अशा अनेक अजरामर साहित्यकृती त्यांच्या नावाने आहेत. २६ मार्च २००८ रोजी नाशिक येथे त्यांचे निधन झाले.

■ ■ ■

### वेदाआधी तू होतास..

वेदाच्या परमेश्वराआधी तू होतास,
पंच महाभूतांचे पाहून, विराट, विक्राळ रूप
तू व्यथित, व्याकूळ होत होतास,
आणि हात उभारून
तू याचना करीत होतास,
त्या याचना म्हणजे ऋचा
सर्व ईश्वरांचे जन्मोत्सव,
तूच साजरे केलेस,
सर्व प्रेषितांचे बारसेही,
तूच आनंदाने साजरे केलेस
हे माणसा, तूच सूर्याला सूर्य म्हटलेस
आणि सूर्य, सूर्य झाला
तूच चंद्राला चंद्र म्हटलेस,
आणि चंद्र, चंद्र झाला
अवघ्या विश्वाचे नामकरण
तू केलेस
अन् प्रत्येकाने मान्य केले,
हे प्रतिभावान माणसा,
तूच आहेस सर्व काही,
तुझ्यामुळेच संजीव सुंदर
झाली ही मही....

# लम्पी आजार, व्यवस्थापन आणि उपाययोजना

**कृषी विज्ञान केंद्र बुलडाणा.**

जनावरांमध्ये झपाट्याने फैलावत असलेल्या लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव लक्षात घेता पशुपालकांनी वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणामार्फत जिल्ह्यातील विविध गावांमध्ये जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून, पशुपालकांना शिफारशीत उपाययोजना करून या विषाणूजन्य रोगापासून जनावरांचे संरक्षण करण्याचे आवाहन कृषि विज्ञान केंद्राकडून करण्यात येत आहे.

**रोगाचे कारण व प्रसारः**

लम्पी स्किन डिसीज हा एक विषाणूजन्य चर्मरोग असून, तो कॅप्रीपॉक्स व्हायरसमुळे होतो. रोगाचा प्रसार प्रामुख्याने चावणाऱ्या माश्या, डास, गोचीड, चिलटे यांच्या माध्यमातून, बाधित व निरोगी जनावरांच्या संपकार्तून, नाक-डोळ्यातील स्त्राव, तोंडातील लाळ चाऱ्यावर व पाण्यावर लागल्यास संसर्ग होतो.



या रोगाचा सर्व वयोगटातील जनावरांवर परिणाम होतो, मात्र लहान वासरे अधिक प्रभावित होतात. उष्ण आणि दमट हवामानात कीटकांची वाढ अधिक असल्याने पावसाळ्यात प्रादुर्भाव वाढतो.

**लक्षणे :**

ताप येणे व दुध उत्पादनात घट, डोळ्यातून पाणी येणे, लसिका ग्रंथीना सूज, त्वचेवर गाठी (१०-५० मिमी व्यासाच्या), मुख्यतः डोके, मान, पायावर, फुप्फुसदाह, कासदाह, गर्भपात व प्रजनन क्षमतेत घट, पांढऱ्या रक्तपेशींची संख्या कमी होणे या रोगाचे लक्षणे आहे.

उपचार व घरगुती उपाय : प्रतिजैविके, ज्वरनाशक, जीवनसत्त्वे (अ व ए) व शक्तिवर्धक औषधांचा वापर, त्वचेवरील व्रणांवर फ्लाय रिपेलंट स्प्रे, तोंडातील व्रणासाठी २% पोटॅशियम परम्यांगनेट द्रावण व बोरोग्लीश्रीन.

**घरगुती उपायः**

१० खायची पाने, १० ग्रॅम मीरे, १० ग्रॅम मीठ यांची पेस्ट करून त्यात गूळ मिसळून जनावरांना द्यावी, पहिल्या दिवशी दर ३ तासांनी, दुसऱ्या दिवशीपासून दिवसातून ३ वेळा १५ दिवसपर्यंत, जखमांमध्ये किडे पडल्यास खोबरेल तेलात कापूर, सीताफळाच्या पानांचा लेप लावावा.

**रोगनियंत्रण व प्रतिबंधात्मक उपाय :**

बाधित व निरोगी जनावरांना वेगळे ठेवावे, एकत्रित चारा-पाणी देऊ नये, गोठ्याचे नियमित फवारणीद्वारे निजंर्तुकीकरण (०.०१% डेल्टामेथ्रीन), पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली लसीकरण करावे, गोठा स्वच्छ ठेवणे, माशा व डास यांचे नियंत्रण करणे अत्यावश्यक आहे. या आजारावर उपाय करण्यापेक्षा प्रतिबंध करणे महत्त्वाचे असून, पशुपालकांनी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा आणि नियमित सल्ला घ्यावा. जनावरांचे नुकसान टाळण्यासाठी वेळीच लसीकरण करून घ्या, असे आवाहन कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा यांनी केले आहे.

■ ■ ■

# उंदरांनी प्याली ८00 बॉटल दारू



आता केवळ मानवच नाही तर उंदीरही भ्रष्टाचाराच्या शर्यतीत सामील झाले आहेत. झारखंडमध्ये उंदरांनी ८०० बाटल्या दारू प्यायल्या, चौकशीत घोटाळा उघडकीस आला.

झारखंडमध्ये १ सप्टेंबरपासून नवीन दारू धोरण लागू होणार आहे. त्यापूर्वी राज्यात दारूचा साठा तपासला जात आहे. या तपासणीत झारखंडमधील धनबादमध्ये ८०२ दारूच्या बाटल्या रिकाम्या आढळल्या.

जेव्हा व्यापाऱ्यांना याचे कारण विचारण्यात आले तेव्हा त्यांनी उंदरांना दोष दिला. त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले की उंदरांनी बाटल्यांचे झाकण कुरतडले आणि सर्व दारू पिऊन टाकली. तथापि, त्यांचा हास्यास्पद युक्तिवाद कामी आला नाही. अधिकाऱ्यांनी व्यापाऱ्यांना नुकसान भरपाई देण्यास सांगितले आहे.

विशेष म्हणजे, धनबादमध्ये उंदरांवर ड्रग्ज चोरीचा आरोप होण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही उंदरांवर पोलिसांनी जप्त केलेला सुमारे १० किलो गांजा खाल्ल्याचा आरोप करण्यात आला होता. हे प्रकरण न्यायालयातही पोहोचले, जिथे न्यायालयाने अधिकाऱ्यांना त्यांच्या हास्यास्पद दाव्याबद्दल फटकारले.

# स्टीलच्या डब्यात चुकूनही ठेवू नका हे ५ पदार्थ



स्टीलचे डबे हे प्रत्येकाच्या स्वयंपाकघरात आढळतात. जवळपास सगळ्याच गोष्टी आपण स्टीलच्या डब्यात साठवून ठेवतो. पण अनेकांना हे माहित नसेल की स्टीलच्या डब्यात काही पदार्थ साठवणे म्हणजे आरोग्य धोक्यात घालण्यासारखं आहे.

डाळी आणि लोणच्यापासून ते लंचबॉक्स भाज्यांपर्यंत, प्रत्येक गोष्टीसाठी परिपूर्ण असल्याचे दिसून येते. हे डबे कोरड्या वस्तू साठवण्यासाठी उत्तम आहेत, परंतु स्टीलचे डबे काही अन्न पदार्थांसाठी वापरणे चुकीचे आहे. कारण ते अन्नपदार्थ स्टीलशी प्रक्रिया होऊ शकते. ज्यामुळे कालांतराने त्या पदार्थाची चव आणि पोषण कमी होते.

**लोणचे :** लोणच्यामध्ये सहसा मीठ, तेल आणि लिंबू, व्हिनेगर किंवा चिंच यांमध्ये नैसर्गिक आम्ल भरपूर प्रमाणात असतात. जर स्टेनलेस स्टील चांगल्या दर्जाचे नसेल तर ते धातूशी प्रक्रिया करू शकतात. यामुळे चवीत बदल होऊ शकतो. लोणच्यासाठी काचेची भांडी हा एक चांगला पर्याय आहे.

**दही :** दही नैसर्गिकरित्या आम्लयुक्त असते आणि स्टीलच्या भांड्यात साठवल्यास, विशेषतः बराच काळ, त्याला एक विचित्र चव येऊ शकते. स्टीलच्या भांड्यांमध्ये किण्वन चालू राहू शकते, ज्यामुळे चव बदलू शकते. दह्यासाठी सिरेमिक किंवा काचेची भांडी वापरल्यामुळे ते थंड आणि स्वच्छ राहते. काचेच्या भांड्यात दह्याचे गुणधर्म टीकून राहतात.

**लिंबू आधारित उत्पादने**

स्टीलच्या डब्यात लिंबूसारखी फळे साठवणे टाळा. स्टीलच्या डब्यात लिंबू, तांदूळ, आमचूर किंवा चिंच असलेली कोणतीही वस्तू साठवल्याने त्यांची चव खराब होऊ शकते आणि त्यांचा ताजेपणा कमी होतो.

**टोमॅटोपासून बनवलेल्या पाककृती :** टोमॅटोमधील नैसर्गिक आम्ल कालांतराने स्टीलशी प्रक्रिया करू शकतात, ज्यामुळे त्या भाज्यांची चव आणि पोषक तत्वे दोन्ही प्रभावित होतात. जर भाज्या उरल्या तर ते सिरेमिक बाउल किंवा काचेच्या डब्यात साठवा.

**फळे आणि फळांचे सॅलड :** कापलेली फळे किंवा मिक्स फ्रूट सॅलड स्टीलमध्ये साठवल्याने नैसर्गिक रस एकत्र मिसळतात आणि स्टीलच्या पृष्ठभागाशी थोडीशी प्रक्रिया देतात. फळांच्या फोडींसाठी हवाबंद काचेचे कंटेनर वापरावे.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### भोंगे काढल्याबद्दल सरकारचे अभिनंदन !

मशिदींवरील अनधिकृत भोंगे हा मागील काही वर्षांपासून सरकारसाठी कळीचा मुद्दा बनला होता. यावरून अनेकदा वादही झाले आहेत. मुंबई उच्च न्यायालयानेही यामध्ये हस्तक्षेप करून अनधिकृत भोंगे काढण्याचे आदेश राज्य सरकारला दिले होते. त्यावर सध्याच्या सरकारने अत्यंत चतुराईने हा प्रश्न मार्गी लावला आहे.

मुंबईतील धार्मिक स्थळांवर लावलेले १६०८ भोंगे उतरवले गेल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली या भोंग्यांमध्ये मशिदींवरील ११४९ भोंगे, मंदिरांवरील ४८, चर्चवरील १०, गुरुद्वार ४ आणि अन्य धार्मिक स्थळांवरील १०४ भोंगे मुंबई पोलिसांनी हटवले आहेत. यासह संपूर्ण महाराष्ट्रात असलेल्या विविध धार्मिक स्थळांवरील ३ हजार ३६७ भोंगे पोलिसांनी हटवले आहेत.

मुंबईतील भोंगे हटवताना कुठेही धार्मिक तणाव उत्पन्न होणार नाही याची पोलिसांनी विशेष काळजी घेतल्याने मुख्यमंत्र्यांनी मुंबई पोलिसांचे विशेष कौतुक केले आहे, तर मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र शासनाच्या या कृतीविषयी समाधान व्यक्त केले आहे. मुंबईतील भोंगे हटवल्यानंतर आता राज्यभरातील प्रार्थनास्थळांवरील भोंगे हटवणार असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. राज्य सरकारने दाखवलेले धाडस नक्कीच कौतुकास पात्र असून भविष्यात हे भोंगे काहीनाकाही निमित्त करून पुन्हा प्रार्थना स्थळांवर चढणार नाहीत याची विशेष काळजी सरकारला घ्यावी लागेल.

■ **जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई.**

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



**ॐ शनिश्वराय नमः**

शनिदेवाच्या फेऱ्याला
सारे हिंदूधर्मिय घाबरतात
त्याच शनिदेवाला त्यांचे ट्रस्टी
बिनधास्त फसवतात?

शंभर गुन्हे भरल्याविना
होत नसतो भंडाफोड
विश्वास घातक्यांची
जिरलीच पाहिजे खोड ..

शनीची वक्रदृष्टी पडली
समजेल कशी असते साडेसाती
पळता भुई थोडी होईल
लटकवा यांना फासावरती ..

# आर्यनचे (नवे) अफेअर




किंग खानचा मुलगा आर्यन खानच्या अफेअरच्या चर्चा सुरूच असतात. अशातच नुकताच तो एका पार्टीत खास मुलीसोबत दिसल्यामुळे नव्या अफेअरच्या बातम्यांना उधाण आले आहे. या मुलीचे नाव लारिसा बोनेसी असून ती ब्राझिलियन मॉडेल, अभिनेत्री आणि डान्सर आहे. लारिसा बोनेसीने या तीनही क्षेत्रांमध्ये चांगले नाव कमावले आहे. बॉलिवूडमध्ये तिच्या कारकिर्दीची सुरुवात अक्षय कुमार आणि जॉन अब्राहम यांच्या 'सुबह होने ना दे' या प्रसिद्ध गाण्यापासून केली. तिने गुरु रंधावाच्या 'सुरमा-सुरमा' सारख्या सुपरहिट म्युझिक व्हिडिओंमध्येही काम केले आहे. खेरीज तिचे म्युझिक व्हिडिओज स्टेबिन बेन आणि विशाल मिश्रा यांच्यासारख्या कलाकारांसोबतही आहेत. तिने 'नेक्स्ट अॅनी' आणि 'थिका' सारख्या साऊथ इंडस्ट्रीतील चित्रपटांमध्ये काम केले आहे. याशिवाय तिने 'गो गोवा गॉन' या बॉलिवूड चित्रपटातही काम केले आहे. लारिसाने मॉडेलिंग कारकिर्दीची सुरुवात चीनमध्ये केली. २०११ मध्ये ती मुंबईत आली आणि तेव्हापासून बॉलिवूड आणि भारतीय मॉडेलिंग इंडस्ट्रीमध्ये सक्रिय आहे. आर्यन खान लारिसापेक्षा जवळपास चार वर्षांनी मोठा आहे.

सध्या या दोघांमधील अफेअरच्या बातम्या चवीने चघळल्या जात असल्या तरी दोघांनी अद्याप यावर कोणतेही अधिकृत विधान केलेले नाही. लारिसा बोनेसी आर्थिकदृष्ट्याही खूप मजबूत असून तिची मालमत्ता सुमारे १८ कोटी रुपये आहे. कारकिर्दीत चांगली कमाई करत तिने बॉलिवूडमध्ये स्वतःची ओळख निर्माण केली आहे. दुसरीकडे आर्यन खानची एकूण संपत्ती सुमारे ८० कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे. त्याने २०२३ मध्ये स्वतःचा फॅशन ब्रँड लाँच केला. यातून त्याला चांगला नफा मिळत आहे.

आर्यनने अलीकडेच दिल्लीतील पंचशील पार्कमध्ये एक आलिशान मालमत्ताही खरेदी केली आहे. आता या दोघांमधील नाते पुढे कसे वळण घेते याकडे मनोरंजनविश्वाचे लक्ष आहे.






# सांगा मी कशी दिसते?

श्वेता तिवारी हे टीव्ही इंडस्ट्रीतील नाव बोल्ड सौंदर्यासाठी ओळखले जाते. श्वेता तिच्या व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्यामुळे अनेकदा चर्चेत असते. ती दररोज सोशल मीडियावर हॉट फोटो आणि व्हिडिओ शेअर केल्यामुळेही प्रसिद्धीझोतात असते. वयाच्या ४४ व्या वर्षीही ती सोशल मीडियावर हॉटनेस पसरवत राहते. अलिकडेच तिचे बाथरूम फोटोशूटचे काही फोटो समोर आले आहेत. तिच्या अधिकृत इंस्टाग्राम हँडलवर हे काही हॉट फोटो आहेत.

ते पाहून चाहते तिची स्तुती करत आहेत. एका चाहत्याने कमेंट केली आहे की, सलमान खानही तुमचा चाहता आहे. इतकेच नाही तर माझी पत्नीही तुमच्या समोर अपयशी ठरते. त्या चाहत्याची ही टिप्पणी पाहून इतर अनेक वापरकर्ते त्याची खिल्ली उडवत आहेत. खरंच, श्वेता तिवारीच्या सौंदर्य आणि बोल्डनेसचे कोणतेही उत्तर नाही. टीव्ही अभिनेत्रीचे हे हॉट फोटो पाहून खऱ्या आयुष्यात ती किती सुंदर असेल, याचा अंदाज बांधत आहेत.

श्वेता तिवारीच्या चाहत्यांची संख्या खूप जास्त आहे. इंस्टाग्राम हँडलवरील तिच्या ५.७ दशलक्ष फॉलोअर्सवरून तुम्ही याचा सहज अंदाज बांधू शकता. श्वेता तिवारीचे वैयक्तिक आयुष्य नेहमीच चर्चेत राहिले आहे. तिचे दोनदा लग्न झाले पण दोन्हीही यशस्वी झाली नाहीत. श्वेता मुलगी पलक तिवारी आणि मुलगा रेयांस कोहलीसह राहते.

# ओटीटीचा आधार मिळाला

पाकिस्तानी अभिनेत्री हानिया आमिरसोबत काम केल्यामुळे दिलजीत दोसांझचा 'सरदार जी ३' भारतीय चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला नाही. त्यानंतर विनोदी अभिनेता विजय राज यांच्या सत्य घटनेवर आधारित 'उदयपूर फाइल्स' च्या प्रदर्शनावरही बंदी घालण्यात आली आहे. अशा परिस्थितीत, आज अशा चित्रपटांबद्दल जाणून घेऊ या जे भारतीय चित्रपटगृहांमध्ये कधीच प्रदर्शित झाले नाहीत. परंतु ते ओटीटीवर असून मोठ्या प्रमाणावर पाहिले गेले आहेत.



✲ अनफ्रीडम– दिग्दर्शक राज अमित कुमार यांच्या 'अनफ्रीडम'वर बोल्ड आणि लेस्बियन कंटेंटला प्रोत्साहन दिल्याचे कारण देत भारतीय चित्रपटगृहांमध्ये बंदी घालण्यात आली होती. सेन्सॉर बोर्डाने त्यात बदल करण्यास सांगितले, जे निर्मात्यांनी मान्य केले नाही. मात्र तो नेटफ्लिक्स आणि यूट्यूबवर पाहिला गेला.

✲ वॉटर– जॉन अब्राहम स्टारर 'वॉटर' चे नावही या यादीत समाविष्ट आहे. बालविधवेच्या वाईट प्रथा लक्षात घेऊन तो बनवण्यात आला होता. परंतु सेन्सॉर बोर्डाने प्रदर्शनाला हिरवा कंदील दिला नाही. अर्थात तो ओटीटी वर पाहिला गेला.

✲ फायर– यात सम लैंगिकतेचा संवेदनशील मुद्दा दाखवण्यात आला होता, जो वादाचे कारण बनला. त्यामुळे तो चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला नाही. मात्र ओटीटी माध्यमातून पाहिला गेला.

✲ परजानिया– हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते नसीरुद्दीन शाह यांच्या 'परजानिया' चे नाव देखील या यादीत समाविष्ट आहे. यात गुजरात दंगलींचा उल्लेख दाखवला असल्यामुळे चित्रपटगृहांमध्ये कधीही प्रदर्शित झाला नाही. पण तो जिओ हॉटस्टारवर उपलब्ध आहे.

# लाडकी जोडी दिसणार पडद्यावर

'बिन लग्नाची गोष्ट' मधून मराठीतील लोकप्रिय आणि लाडक्या जोड्यांपैकी एक असणारे प्रिया बापट आणि उमेश कामत हे क्युट कपल तब्बल १२ वर्षांनंतर पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर दिसणार आहे. १२ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात ही रसिकप्रिय जोडी दिसणार असून नुकतंच त्याचं मोशन पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आलं आहे.

यासंबंधी बोलताना दिग्दर्शक आदित्य इंगळे म्हणाले, 'ही गोष्ट प्रेमाची, नात्यांमधल्या समज गैरसमजांची, वर्षानुवर्षे मनात धरून ठेवलेल्या गाठी सुटण्याची आहे. हा चित्रपट आजच्या काळाचा आरसा असून त्यात प्रेक्षकांना स्वतःचं प्रतिबिंब बघायला मिळेल. काहींना नव्याने प्रश्न पडतील, तर काहींना जुन्या प्रश्नांची उत्तरं मिळतील. हलक्या फुलक्या प्रसंगातून मांडलेली ही गोष्ट प्रेक्षकांचं मनोरंजन नक्की करेल.' निर्माते नितीन वैद्य सांगतात, 'प्रिया आणि उमेशची केमिस्ट्री प्रेक्षकांसाठी नेहमीच खास असते. अशात इतक्या वर्षांनी ते एकत्र येत असल्याचा आनंद आहे. चित्रपटाची संकल्पना हटके असून ती आजच्या काळाशी थेट संबंधित आहे.' 'बिन लग्नाची गोष्ट' येत्या १२ सप्टेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. तेव्हा बघू या, त्यात नवे काय बघायला मिळते ते...

पोस्टरमधील दृश्यामुळे प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. यात प्रिया हाताची घडी घालून, मिश्कील चेहऱ्याने उभी आहे तर उमेश हातात हार घेऊन, डोक्याला मुंडावळ्या बांधून उभा आहे. या सगळ्यांतून ही गोष्ट पारंपरिक विवाहसंस्थेच्या बाहेर जाऊन नात्यांची नवी मांडणी करणारी असल्याचे स्पष्ट होत आहे.




# हॅरी पॉटरची जादूई दुनिया

जे.के. रोलिंग यांच्या कादंबरीवर आधारित 'हॅरी पॉटर' ही चित्रपट मालिका जगभरातील प्रेक्षकांना प्रचंड आवडली. २००१ मध्ये पहिला भाग 'हॅरी पॉटर अँड द फिलॉसॉफर्स स्टोन' प्रदर्शित झाला होता तेव्हा त्यात डॅनियल रॅडक्लिफ आणि एम्मा वॉटसन यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. या चित्रपट मालिकेचे एकूण आठ भाग होते. मात्र यातील पात्रे लोकांच्या हृदयात इतकी खोलवर कोरली गेली आहेत की निर्मात्यांनी त्याच्या टीव्ही आवृत्तीची घोषणा केल्यानंतर चाहत्यांनी जाहीर नाराजी व्यक्त करण्यास सुरूवात केली. निर्मात्यांचा हा निर्णय चुकीचा ठरू शकतो, असे मत अनेकांनी व्यक्त केले.




आता हॅरी पॉटर या टीव्ही मालिकेत डॅनियलची जागा डोमिनिक मॅकलॉघलिनने घेतली असून एम्माची जागा अरेबेला स्टॅन्टनने घेतली आहे. बऱ्याच प्रतीक्षेनंतर निर्मात्यांनी शूटिंगचे अपडेट दिले असून हॅरी पॉटर बनलेल्या डोमिनिकचा पहिला लूकही शेअर केला आहे. मात्र तो पाहून चाहते आश्चर्यचकित झाले आहेत.

वॉर्नर ब्रदर्सने नुकतेच बहुप्रतिक्षित 'हॅरी पॉटर' मालिकेचे शूटिंग सुरू केले आहे. यासोबतच त्यांनी अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवर 'हॅरी पॉटर' लूकमधील डोमिनिकचा हा पहिला फोटोही शेअर केला आहे. यात त्याने गोल चष्मा घातला असून आणि व्यक्तिरेखेनुसार शाळेचा गणवेशही घातला आहे. हॅरी पॉटरचा हा नवीन लूक चाहत्यांच्या पसंतीस उतरला आहे. हॅरी पॉटरची भूमिका साकारण्यासाठी ही एक परिपूर्ण निवड असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. उत्कृष्ट गणवेश, आयकॉनिक चष्मा... आशा आहे की तुम्ही पुस्तकातील या पात्रांना न्याय देऊ शकाल, असे काहींनी लिहिले आहे तर हिरवे डोळे पाहून थोडे वाईट वाटते... असे म्हणत एका प्रेक्षकाने आपले मत नोंदवले आहे.



# बॉक्स ऑफिसवर 'मालिक'ची घसरण

राजकुमार रावचा 'मालिक' ची बॉक्स ऑफिसवरील कामगिरी जाणून बघण्यापूर्वी आपल्या कॉमिक टायमिंगने प्रेक्षकांना हसवणारा राजकुमार यात थोड्या वेगळ्या आणि भयंकर शैलीत दिसला आणि प्रेक्षकांना भावला हे मान्य करावे लागेल. अर्थात रिलीजच्या पहिल्या दिवसापासूनच त्याला बॉक्स ऑफिसवर चांगली सुरुवात करता आली नाही. सुरुवातीच्या वीकेंडनंतरही तो दुहेरी आकड्यांमध्ये कमाई करू शकला नाही. यावरूनच राजकुमार रावच्या या चित्रपटाची स्थिती आठवड्यात आणखी वाईट होणार असल्याचा अंदाज आधीच वर्तवण्यात आला होता आणि हेच घडले.

'मालिक'ने रिलीजच्या चौथ्या दिवशी अंदाजे १.५० कोटींची कमाई केली जी राजकुमार रावच्या स्टारडम आणि मागील चित्रपटांच्या कमाईच्या मानाने खूपच कमी आहे. त्यामुळेच आधीच्या चित्रपटांच्या तुलनेत हा चित्रपट कमकुवत दुवा ठरला असून खराब कथा हेच त्यामागील कारण असल्याचे सांगितले जात आहे.

या चित्रपटाची कथा अलाहाबादमधील एका गुंडाची कहाणी दाखवते ज्याच्यासमोर प्रशासन आणि राजकारणातील मोठे नेतेही गप्प राहतात. पण तो मुळात गुंड कसा बनतो, याचे कथानक 'मालिक'मध्ये दाखवले आहे.

या चित्रपटाने पहिल्या दिवशी ४.०२ कोटींची कमाई केली. दुसऱ्या दिवशी ५.४५ कोटी, तिसऱ्या दिवशी ५.५५ कोटी, चौथ्या दिवशी १.५० कोटी असे करत त्याने आत्तापर्यंत १६.५२ च्या पुढे कमाई केली आहे. मात्र 'मालिक' चे बजेट ५० कोटींपेक्षा जास्त असल्याचे सांगितले जात आहे. या आधारावर सध्या तेवढी कमाई करणे कठीण दिसते.

# पुन्हा अनुभवा तोच थरार

महान खेळाडू, धावपटू मिल्खा सिंग यांची कहाणी दिग्दर्शक ओम प्रकाश मेहरा यांनी २०१३ मध्ये 'भाग मिल्खा भाग' या बायोपिकद्वारे मोठ्या पडद्यावर आणली होती. उत्तम कथेमुळे तसेच फरहान अख्तरच्या दमदार अभिनयामुळे प्रेक्षकांना हा चित्रपट खूप आवडला होता. आता थिएटरमध्ये तो पुन्हा प्रदर्शित करण्याची तयारी सुरू असून देशातील काही निवडक ठिकाणी सादर केला जाणार आहे. मिल्खा सिंग यांच्या जीवनाचे सार या चित्रपटात दाखवण्यात आले होते. फाळणीनंतर त्यांच्या आयुष्याला नवे वळण मिळाले आणि नंतर ते भारताचे सर्वोत्तम खेळाडू कसे बनले याचे अतिशय उत्तम पद्धतीचे सादरीकरण पाहून चाहते आनंदले.

आता १२ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त निर्माते पुन्हा एकदा हा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित करणार आहेत. तो याच महिन्यात पीव्हीआर आणि आयनॉक्स सारख्या मल्टीप्लेक्समध्ये पुन्हा एकदा पाहायला मिळेल. 'भाग मिल्खा भाग'च्या पुनर्प्रदर्शनाबाबत अभिनेता फरहान अख्तर म्हणातो, 'मिल्खा सिंग यांच्या बायोपिकमध्ये काम करणे माझ्यासाठी खूप मोठा सन्मान होता. त्यांची कहाणी प्रत्येक भारतीयाला माहीत असणे आवश्यक आहे. म्हणून आता पुन्हा थिएटरमध्ये येत असल्याचा मला आनंद आहे. ही उत्साह द्विगुणीत करणारी गोष्ट आहे.'


'भाग मिल्खा भाग'च्या उत्कृष्ट कथेची जादू बॉक्स ऑफिसवरही दिसून आली होती. समीक्षक आणि प्रेक्षकांकडून त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला होता. त्याचा जगभरातील व्यवसाय सुमारे १७० कोटी रुपयांचा होता. आता पुन्हा प्रदर्शित झाल्यानंतरही प्रेक्षक त्याला भरघोस प्रतिसाद देतील अशी अपेक्षा आहे.




# 'डीडीएलजे' होतोय तिशीचा

बॉलीवूडमधील सर्वाधिक रोमँटिक चित्रपटांपैकी एक असणारा 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' येत्या ऑक्टोबरमध्ये ३० वर्षे पूर्ण करत आहे. अलिकडेच काजोलने डीडीएलजेच्या शूटिंगदरम्यानचे काही मनोरंजक आणि मजेदार किस्से शेअर केले. काजोल म्हणाली की, स्वित्झर्लंडमध्ये शूटिंग करताना बऱ्याच मजेदार गोष्टींना तोंड द्यावे लागले होते. साडी नेसून नाचणे, टेकडीवरून खाली पडणे असे क्षण खरोखरच विचित्र होते. एकदा तर मी खरोखरच खाली पडले. शूटिंग दरम्यान खूप गर्दी होती. सूर्यास्तापूर्वी दृश्य पूर्ण करायचे होते. आमच्याकडे शूटसाठी फक्त १५ मिनिटे होती. यात स्वत:ला सावरत धावणे, कपडे सावरणे खूपच कठीण होते... असे तिने नेहमीच्या मजेदार ढंगात सांगितले आणि जुन्या आठवणींना उजाळा दिला.

या चित्रपटाचे चित्रीकरण एखाद्या सुट्टीसारखे होते, असे तिने यावेळी सांगितले. आम्ही स्वित्झर्लंडमध्ये भरपूर फिरलो. भरपूर खाल्ले, खूप मजा केली आणि खूप हसलो... असे ती म्हणाली. पटकथा चांगली असल्यामुळे हा चित्रपट यशस्वी होणार याची संपूर्ण चमूला खात्री होती. म्हणूनच आजही त्याच्याशी आमचे भावनिक नाते असल्याचे मत तिने व्यक्त केले.



१९९५ मध्ये प्रदर्शित झालेला 'डीडीएलजे' भारतातच नाही तर जगभरातील हिंदी चित्रपटप्रेमींसाठी एक 'कल्ट क्लासिक' बनला आहे. शाहरुख खान आणि काजोलच्या जोडीने त्यातील राज आणि सिमरन ही पात्रे अमर केली. हा भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सर्वात जास्त काळ चित्रपटगृहात प्रदर्शित होणारा चित्रपटही आहे. तेव्हा सध्या निर्माते चित्रपटाच्या ३० व्या वर्धापन दिनानिमित्त विशेष कार्यक्रम आणि स्क्रीनिंगचे नियोजन करत आहेत. निर्मात्यांबरोबरच प्रेक्षकांच्या मनातही डीडीएलजेशी संबंधित आठवणी आणि कथा तितक्याच ताज्या आहेत. तेव्हा चाहत्यांसाठी हा साजरा करण्याजोगा काळ ठरेल यात शंका नाही.

# काटेच्या कृत्याला पाठिंबा नाही

## मंत्री बावनकुळे यांची स्पष्टोक्ती



■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १६ :
प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा मी निषेध करतो. त्यांच्यावर जो हल्ला झाला तो आम्हाला मान्य नाही. राहिला प्रश्न दीपक काटेचा तर अडीच वर्षांपूर्वी काटेच्या प्रवेशावेळी मी बोललो की हा चांगले काम करेल, यांच्या पाठीशी आम्ही सर्व लोकं आहोत. कुणी पक्षात येत असेल त्यावेळी आपण हे बोलत असतो, असे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, आपण विचाराची लढाई लढू शकतो. पण आपले संस्कार, संस्कृती अशा भ्याड हल्ल्याला देत नाही. प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याला आमचे समर्थन नाही.कुठल्याही व्यक्तीकडून याचे समर्थन नाही. दीपक काटेवर पोलिसांनी कारवाई केली आहे. अजून काही कारवाई पोलिस करतील.

**मी जातीय राजकारण करत नाही**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, दीपक काटेंनी केलेले कृत्य चुकीचे आहे, आम्ही त्याचे समर्थन करत नाही. ना भाजपचे कोणता पदाधिकारी त्यांच्या या कृतीचे समर्थन करेल. दीपक काटे दोन तीन वेळा मला भेटले. मी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही.

अनिल देशमुख यांनी माझ्यावर कधीही कोणता आरोप केला नाही. आम्ही संस्काराने काम करणारे कार्यकर्ते आहोत. प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध आहे. आम्ही वैचारिक लढाई लढतो रस्त्यावर नाही.

बावनकुळे म्हणाले की, चंद्रपूर जिल्ह्यातील १४ गावे हे तेलंगणा आणि महाराष्ट्र सीमेवर आहेत, ही सर्व गावे महाराष्ट्राची आहेत. त्यांचे गावठाण मात्र आपल्या राज्यात राहिल यामुळे सीमावर्ती भागातील १४ गावांचा प्रश्न सुटणार आहे. १४ गावातील नागरिक हे १०० टक्के महाराष्ट्रातील मतदार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत त्या महाराष्ट्रातच राहणार आहेत.

# असंवेदनशीलतेमुळे दिव्यांग आयुक्तांचे निलंबन

## आ. संदीप जोशी यांच्या लक्षवेधीवर मंत्र्यांचे आश्वासन ■ मातोश्री शोभाताई भाकरे मतिमंद शाळेवर प्रशासक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :
नागपुरच्या गुलशननगर येथील मातोश्री शोभाताई भाकरे मतिमंद मुलामुलींच्या निवासी शाळेच्या कारभारातील गंभीर असंवेदनशीलतेच्या पार्श्वभूमीवर दिव्यांग आयुक्तांचे निलंबन करण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन अपंग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधानसभेत दिले. भाजप आमदार संदीप जोशी यांनी या प्रकरणात लक्षवेधी सूचना उपस्थित करत उदासीनतेकडे सभागृहाचे लक्ष वेधले होते.

यासंदर्भात आमदार संदीप जोशी यांनी याच अधिवेशनात काही दिवसांपूर्वी प्रश्न उपस्थित केला होता. याच मुद्यावर आज त्यांनी लक्षवेधी सूचना मांडत सभागृहाचे लक्ष वेधले.

आमदार जोशी यांनी सांगितले की, शाळेतील कर्मचाऱ्यांवर अन्याय, संस्थेच्या कारभारातील अपारदर्शकता, व नियमित वेतन देण्यात होणाऱ्या विलंबाच्या तक्रारी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहेत. यामुळे शाळा बंद पडण्याची व कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ येण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

संस्थेने घेतलेले कर्ज चुकविण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून वसुली केली जात आहे. कर्मचाऱ्यांना धमकावले जात आहे. बंदुकीचा धाक दाखविला जात आहे. संस्थेला मिळणारे आठ टक्के अनुदान संस्थाचालक स्वतःकडेच ठेवत आहेत. वारंवार तक्रारी करूनसुद्धा प्रशासन स्तरावर कुठलीही कार्यवाही करत नाही. त्यामुळे प्रशासनावर शंका घेण्यास वाव आहे. जिल्हा परिषद मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांच्या शाळेसंदर्भातील १७ फेब्रुवारी २०२५ च्या स्वयंमूल्यांकन अहवालात १०० पैकी ८० गुण असून कार्यशाळा अ श्रेणीत आहे.



९ मे २०२५ च्या दुसऱ्या अहवालात १०० पैकी २३ गुण असून ती क श्रेणीत दाखवली आहे. दिव्यांग आयुक्तांकडे १० जून, १७ जून, २४ जून रोजी सुनावणी होती. मात्र प्रक्रिया करण्यात आली नाही. त्यामुळे हेतु संशयास्पद आहे.

सभागृह सुरू असताना आपण स्वतः दिव्यांग आयुक्तांना या सर्व समस्यांकडे लक्ष देण्याबाबत फोन केला. मात्र साधे उत्तरही आले नाही. हा असंवेदनशीलतेचा कळस आहे. त्यामुळे मातोश्री शोभाताई भाकरे मतिमंद शाळेवर तीन वर्षांकरिता प्रशासक बसविण्यात यावा, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अहवालात असलेली गुणांची तफावत बघता केलेली गडबड लक्षात येते. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का? संस्थाचालकांचा बंदुकीचा परवाना रद्द करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणार का? आणि संवेदनशील विषयाला असंवेदतेने हाताळणाऱ्या दिव्यांग आयुक्तांवर कार्यवाही करणार का? असे प्रश्न आमदार संदीप जोशी यांनी लक्षवेधीदरम्यान उपस्थित केले.

त्यावर उत्तर देताना दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे म्हणाले, शाळेतील व्यवस्थापनाच्या तक्रारी व कर्मचाऱ्यांवरील अन्यायाबाबतची प्रकरणे गंभीर आहेत. याची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. विशेषतः या प्रकरणात असंवेदनशील व दुर्लक्ष करणाऱ्या दिव्यांग आयुक्तांना सक्तीच्या रजेवर पाठवून निलंबनाची प्रक्रिया सुरू करण्याची शिफारस सरकारला करण्यात येईल, असे ते म्हणाले.

या प्रकरणातील जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद असल्याचा मुद्दासुद्धा गंभीर आहे. याबाबत चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस शासनाकडे करण्यात येईल, असे आश्वासन सावे यांनी दिले.

विशेष म्हणजे, या संदर्भात यापूर्वी आमदार जोशी यांनी मुख्यमंत्री व अपंग कल्याण विभागास पत्र पाठवून शाळेवर प्रशासक नेमण्याची मागणी केली होती. त्या मागणीची दखल घेत संस्थेवर आजपासून अर्थात १६ जुलैपासून प्रशासक नेमण्यात येत असल्याचे अतुल सावे यांनी यावेळी सांगितले.

कर्मचाऱ्यांना बंदुकीचा धाक दाखविण्यात येत असल्याचा प्रकार अत्यंत गंभीर असून नियुक्त प्रशासक या बाबीची सखोल चौकशी करून अहवाल सादर करतील. त्यानंतर संस्थाचालकावर योग्य ती कारवाई करण्यात येणार असल्याचे सावे यांनी स्पष्ट केले.

# नदीजोड प्रकल्प वरदान

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या विविध प्रलंबित विषयांचा आढावा



मंत्री महाजन यांनी विधान भवन, मुंबई येथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या समवेत नागपूर व अमरावती जिल्ह्यातील जलसिंचन प्रकल्पांचा कामांची आढावा बैठक देखील घेतली. सदर बैठकीत गोसेखुर्द प्रकल्प, पेंच प्रकल्प, अमरावती जिल्ह्यातील प्रकल्प, चिंचघाट प्रकल्प, जिगांव प्रकल्पाच्या भूसंपादनाचा वाढीव मोबदला, तसेच विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या शासनाकडील विविध प्रलंबित विषयांचा आढावा घेण्यात आला. याप्रसंगी आमदार चरणसिंग ठाकूर यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :
राज्यातील दुष्काळी भागाला पाणी पोहोचवण्याच्या दृष्टीने नदीजोड प्रकल्प महत्त्वाचा असून हा प्रकल्प राज्यासाठी वरदान असल्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी विधान परिषदेत प्रस्तावाला उत्तर देताना सांगितले.

राज्यात अनेक नदीजोड प्रकल्प सुरू असून वैनगंगा झ नळगंगा हा सर्वात मोठा प्रकल्प आहे. त्यासोबतच नार पार गिरणा, कोकणातील सावित्री, गोदावरीचे कोकण खोरे, उल्हास, वैतरणा तसेच तापी खोऱ्यातही अनेक प्रकल्प राबवण्यात येणार आहेत.

अतिरिक्त पाणी असलेल्या खोऱ्यातून कमी तसेच पाणी नसलेल्या नदी खोऱ्यात पाणी पोहचवण्याची शासनाची भूमिका असल्याचेही मंत्री महाजन यांनी सांगितले.

यासोबतच राज्यात अनेक सिंचन प्रकल्प आहेत. अपूर्ण असणारे सिंचन प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात येत आहे.

तसेच तापी खोऱ्यामध्ये मेगा रिचार्ज प्रकल्प राबवण्यात येत असून यासाठी मध्य प्रदेश सरकार सोबत सामंजस्य करारही करण्यात आला आहे.

बळीराजा योजना, प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना या माध्यमातून सिंचन क्षेत्र वाढवण्यावर भर देण्यात येत असल्याचेही जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी सभागृहात सांगितले.

## पंकज भोयरांचा स्फोटक खुलासा

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :
नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा येथील जामिया इस्लामिया इशातूल उलूम या धार्मिक शिक्षण संस्थेवर गंभीर आरोपांची मालिका सुरू झाली आहे. येमेन देशातील दोन नागरिक या संस्थेत बेकायदेशीररीत्या वास्तव्यास आढळल्याने गुन्हा दाखल करण्यात आला असून, संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली चौकशी केली जाणार असल्याची माहिती गृहराज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य आमदार देवेंद्र कोठे यांनी लक्षवेधी सूचना मांडल्यानंतर आमदार राजेश पाडवी, हरिष पिंपळे यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

# ८० लाखांचा गुटखा जप्त



■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १६ :
बुलडाणा जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत एक ट्रक पकडला असून त्यामधून ८० लाख ६० हजार रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई गुप्त माहितीवरून करण्यात आली.

या छाप्यात मध्य प्रदेशातील सईद खान राशिद खान या चालकाला अटक करण्यात आली आहे. गुटख्यासह ट्रकही जप्त करण्यात आला असून हा प्रकार चिखली पोलिसांकडे पुढील तपासासाठी सोपवण्यात आला आहे.

## ८ वर्षांपासून सरकारने रोखला

# नेमबाज राही सरनोबतचा पगार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
महाराष्ट्राची आंतरराष्ट्रीय नेमबाज राही सरनोबतचा पगार राज्य सरकारने मागील ८ वर्षांपासून रोखल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या प्रकरणी राहीने वारंवार प्रशासनाकडे विचारणा केली, पण न्याय मिळाला नाही. क्रीडा क्षेत्रात देशाची मान उंचावणाऱ्या खेळाडूसोबत हा प्रकार घडल्यामुळे मोठा संताप व्यक्त केला जात आहे.

**२०१४ मध्ये उपजिल्हाधिकारी पदी नियुक्ती**



राही सरनोबत एक आंतरराष्ट्रीय नेमबाज आहे. तिने देशासाठी अनेक पदके जिंकली आहेत. क्रीडा क्षेत्रातील तिच्या योगदानामुळे सरकारने २०१४ साली तिची उपजिल्हाधिकारी पदी नियुक्ती केली होती. त्यानंतर तिला सुरुवातीची ३ वर्षे नियमित वेतन मिळाले. पण त्यानंतर प्रशिक्षणाची ३ वर्षे पूर्ण न केल्यामुळे तिचे वेतन रोखण्यात आले. मागील ८ वर्षांपासून तिला वेतन देण्यात आले नाही.

राहीने २००८ मध्ये राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेत पहिले सुवर्ण पदक मिळविले. आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी ती पहिली भारतीय महिला आहे. राही सरनोबत ही वेगवेगळ्या स्पर्धांत भारतीय संघाचा भाग राहिली आहे. खेळाडू म्हणून व्यस्त असल्यामुळे तिला प्रशिक्षणासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही.

ही बाब स्वतः राही व तिच्या कुटुंबीयांनी प्रशासनाच्या कानावर घातली. पण त्याला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या प्रकरणात लक्ष घातले आहे. राहीने काही दिवसांपूर्वी आपल्या कुटुंबीयांसह अजित पवारांची घेत भेटली होती. मात्र, अद्याप तोडगा निघाला नाही.

: लोकसेवार्थ :

# पर्यावरण संवर्धनासाठी सह्याद्री संकल्प



**लोकजागर**

आपण समाजच देण लागतो या भावनेतून आपल्या समाजात वृध्द, अपंग, अंध, अबला महिला, अनाथ बालकांसाठी काम करणाऱ्या अनेक सामाजिक संस्था आपल्या परीने आपला खारीचा वाटा उचलता असतात.

परंतु याच समाजाचा भाग आपली जैव विविधता देखील आहे आणि पर्यायाने आपल्या सभोवतालच्या पर्यावरणातील विविध पक्षांचे संवर्धन व्हावे आणि त्या अनुषंगाने पर्यावरणाची जैव साखळी अबाधित राहावी यासाठी अनेक पर्यावरणवादी संस्था कार्यरत आहेत या पैकीच एक संस्था म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यातील सह्याद्री संकल्प हि सामाजिक संस्था.

रत्नागिरी जिल्ह्यामधील जंगले वाढवण्यासाठी आणि त्यांच्या संवर्धनासाठी सह्याद्री संकल्प संस्था काम करत आहे. ही मोहीम हाती घेतल्यानंतर जंगलांच्या संवर्धनासाठी धनेश पक्ष्यांचा मोठा हातभार लागत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर या पक्ष्यांच्या वाढीसाठी प्रयत्न सुरु केले. गेल्या १७ वर्षांपासून ही संस्था जंगले आणि देवराया वाचवण्यासाठी आणि त्यासाठी धनेश पक्ष्यांच्या संरक्षणासाठी काम करत आहे. या कामासाठी त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे.

कोकणात आढळणाऱ्या धनेश पक्ष्याच्या चार प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. सह्याद्री संकल्पने त्याची कारणे शोधून त्यावर संशोधन करण्यास सुरुवात केली. यासाठी आधुनिक उपकरणांचा वापर करून धनेश पक्ष्याच्या कृत्रिम ढोल्या बनवण्यास सुरुवात केली गेली.

या पक्ष्याला जंगलाचा शेतकरी म्हणून ओळखले जाते. त्याच्या विष्ठेमधून मिळणाऱ्या फळांच्या बिया गोळा करून त्यातून रोपे तयार केली जात आहेत. यासाठी रोपवाटिका (नर्सरी) उभारण्यात आली आहे. मात्र अपुऱ्या आर्थिक साहाय्यामुळे संस्थेच्या कामाला मर्यादा येत आहेत.

भावी पिढीचा विचार करून या संस्थेनेधनेश पक्ष्याच्या प्रजाती वाढविणे, त्या टिकविणे तसेच जंगलाचे संवर्धन करणे हे काम हाती घेतले आहे. यासाठी विस्तारित रोपवाटिकेची गरज, अत्याधुनिक कॅमेरे, मानधन तत्त्वावर जंगलातील ढोल्यांची देखभाल करण्यासाठी याबरोबर कृत्रिम ढोल्या बनविण्यासाठी संस्थेला आर्थिक मदतीची गरज आहे.

धनेश पक्षी आणि जंगले किती गरजेची आहेत, याचे महत्त्व पटवून देण्यासाठी सह्याद्री संकल्प संस्थेकडून रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड या जिल्ह्यांमध्ये कार्यशाळा आणि संमेलन घेतली जातात. पर्यावरणाचा होणारा ऱ्हास रोखण्यासाठी संस्थेने उचललेले हे पाऊल कौतुकास्पद आहे.

या मोहिमेत आता धनेश निसर्ग मित्र सहभागी होऊ लागले आहेत. अशा संस्थेच्या कार्यात आपणदेखील हातभार लावणे गरजेचे झाले आहे. सह्याद्री संस्थेच्या विस्तारासाठी आणि त्यांच्या कायार्साठी आर्थिक मदतीचे आवाहन संस्थेमार्फत करण्यात येत आहे. खरोखरच निसगार्तील दुर्मिळ अशा पक्षांचे संवर्धन करण्यासाठी झटणाऱ्या अशा संस्थेला एक सामाजिक बांधिलकी म्हणून आपण देखील मदतीचा हातभार लावायला हवा नाही का?

■ ■ ■

## ऐतिहासिक ड्रायव्हर ड्राफ्टने मुंबईत भारतीय रेसिंग फेस्टिव्हल २०२५ ची सुरुवात

इंडियन रेसिंग लीगने (आयआरएल) २०२५ हंगामासाठीची संपूर्ण संघरचना ड्रायव्हर ड्राफ्टद्वारे जाहीर केली असून, यात आंतरराष्ट्रीय विजेते, भारतीय टॅलेंट्स आणि महिला रेसर्स यांचा समावेश असलेले २४ ड्रायव्हर्स सहा फ्रँचायझींमध्ये निवडले गेले.



मुंबईत आयोजित केलेल्या या कार्यक्रमात फ्रँचायझी मालक, लीग अधिकारी आणि प्रसारमाध्यमे एकत्र आली आणि या मोसमाची औपचारिक सुरुवात झाली. संघ तयार करण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी या कार्यक्रमाची रचना करण्यात आली होती. हा हंगाम जागतिक पातळीवरील स्पर्धा, जागतिक दर्जाचे टॅलेंट आणि प्रेक्षकांशी वाढती गुंतवणूक यासाठी ओळखला जाणार आहे.

या ड्राफ्टमध्ये प्रत्येक फ्रँचायझीने चार ड्रायव्हर निवडले. त्यामध्ये एक अनुभवी आंतरराष्ट्रीय ड्रायव्हर, एक उदयोन्मुख आंतरराष्ट्रीय किंवा भारतीय वंशाचा चालक, एक देशांतर्गत भारतीय चालक आणि एक महिला चालक आदींचा समावेश होता. निवड केवळ प्रतीकात्मक नसून, रणनीतिक दृष्ट्याही महत्त्वाची होती. टीम्सनी त्यांच्या चालकांची निवड ड्रायव्हिंग स्टाइल, ट्रॅकचा अनुभव आणि परफॉर्मन्स डेटाच्या आधारे केली.

अंतिम ग्रिडमध्ये काही आघाडीची आणि प्रतिष्ठित नावे झळकली आहेत.

नील जानी (माजी फॉर्म्युला वन टेस्ट ड्रायव्हर आणि ले मांस विजेता), जॉन लँकास्टर (जीपी २ आणि एंड्युरन्स रेसिंगमध्ये भरपूर अनुभव असलेले ड्रायव्हर) आणि राऊल हायमॅन(भारतीय वंशाचा दोन वेळेचा आयआरएल चॅम्पियन) यांचा समावेश आहे.

याशिवाय रुहान अल्वा, सोहिल शहा, साई संजय आणि अक्षय बोहरा आदी तरुण गुणवंत आपल्या वेगवान आणि धारदार रेसिंग कौशल्यामुळे नजरा खिळवून ठेवतात. महिला ड्रायव्हरमध्ये फॅबिएन वोल्वेंड, गॅब्रिएला जिल्कोवा आणि केटलीन वूड यांचा समावेश असून त्यांनी डब्ल्यू सीरिज, एफ थ्रीआणि जीटी रेसिंग फॉरमॅट्समध्ये आंतरराष्ट्रीय अनुभव प्राप्त केलेला आहे. त्यामुळे या सीझनचा थरार आणखी वाढणार हे निश्चित.

भारतीय चित्रपटसृष्टी आणि क्रीडा क्षेत्रातील काही प्रसिद्ध व्यक्तिमत्वे संघमालक म्हणून उपस्थित होती. त्यांनी त्यांच्या संघांची अधिकृत घोषणा केली आणि लीगबाबतचा आपला दृष्टिकोन स्पष्ट केला. प्रत्येक फ्रँचायझीने त्यांच्या तांत्रिक टीमसह संपूर्ण नियोजन करून संघ बांधणी केली. केवळ स्पर्धात्मक दृष्टिकोन न ठेवता, एक ब्रँड तयार करण्यावर भर दिला गेला.

दिल्लीच्या स्पीड डेमन्सपासून ते नवीन संघ किच्चाज किंग्ज बेंगळुरूपर्यंत सर्व फ्रँचायझी आता पूर्णपणे तयार आहेत. २०२५ चा हंगाम ऑगस्टपासून सुरू होणार असून, विविध शहरांमध्ये कायमस्वरूपी सर्किट्स आणि अर्बन स्ट्रीट ट्रॅकवर रेसिंग स्पर्धा आयोजित केल्या जाणार आहेत.

कार्यक्रमाचा शेवट हाय-टी दरम्यान झालेल्या अनौपचारिक संवादाने झाला. तेथे व्यवस्थापन, संघमालक आणि माध्यमांचे प्रतिनिधी यांच्यात दिलखुलास चर्चा रंगली. हा दिवस केवळ एका हंगामाची सुरुवात नव्हे, तर मोटर स्पोर्टमधील नव्या पर्वाची नोंद ठरला. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## मुंबईकरांसाठी पॉट टॅक्सी, रोप वे

# वाहतुकीचा नवा पर्याय

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
राज्य सरकारने प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले आहे. मुंबईत प्रवाशांची होणारी गर्दी पाहता प्रवाशांचा प्रवास सुकर व्हावा यासाठी सरकारने जलवाहतूक, पॉट टॅक्सी (हवेतून चालणाऱ्या टॅक्सी) आणि रोप वे यासारख्या पर्यायी वाहतूक व्यवस्थांचा विचार सुरू केला आहे.

अशा वाहतूक सेवांच्या माध्यमातून परिवहन सेवा अधिक सक्षम करण्यासाठी उपाययोजना करणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बुधवारी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

भाजपचे आमदार अतुल भातखळकर यांनी मुंब्रा येथील रेल्वे अपघाताच्या संदर्भात आज विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. या लक्षवेधी सुचेनावरील चर्चेला उत्तर देताना सरनाईक यांनी पयार्यी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या संदर्भात माहिती दिली. परिवहन सेवेवरील वाढता ताण कमी करण्यासाठी खासगी आस्थापनांच्या कार्यालयीन वेळेबाबत टास्क फोर्स स्थापन करावा लागेल. या संदर्भातही उचित कार्यवाही केली जाईल. तसेच ॲप-आधारित परिवहन सेवांच्या गैरप्रकारांवरही सरकारने कारवाई सुरू केली आहे, असे सरनाईक म्हणाले.

रेल्वे केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत असली तरी राज्यातील प्रवाशांच्या सुरक्षेबाबत राज्य सरकार गंभीर आहे. मुंब्रा येथील रेल्वे अपघात ही अतिशय दुर्दैवी घटना आहे. यात पाच प्रवाशांचा मृत्यू तर नऊ प्रवासी जखमी झाले. अपघातानंतर जखमींना तातडीने सरकारी आणि खासगी रुग्णालयात दाखल करून त्यांच्यावर उपचार करण्यात आले, असे सरनाईक म्हणाले.

मुंब्रा येथील अपघाताच्या पार्श्वभूमीवर रेल्वे विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक घेण्यात आल्याची माहिती सरनाईक यांनी दिली.

## अवैध सावकारी प्रकरणांची जिल्हाधिकारी स्तरावर चौकशी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
शासकीय परवाना नसताना सावकारी व्यवसाय करून शेतकऱ्यांच्या जमिनी बेकायदेशीरपणे हडप करण्याच्या तक्रारींवर आता जिल्हाधिकारी स्तरावर चौकशी करण्यात येणार येत असल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी बुधवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. तसेच जमीन हडपण्याच्या आतापर्यंतच्या अशा प्रकरणांमध्ये ७७१ हेक्टर जमीन शेतकऱ्यांना परत मिळवून देण्यात आल्याचेही पाटील यांनी सांगितले.

राज्यातील अवैध सावकारीबाबत संजय देरकर यांनी प्रश्न विचारला होता. यावेळी विचारण्यात आलेल्या प्रश्नांना उत्तर देताना अशा प्रकरणांमध्ये शासनाने कठोर भूमिका घेतली असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले.

### शिक्षणतज्ज्ञ प्रा. पंढरीनाथ मांडवगणे यांचे निधन

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १६ :
अकोला येथील ज्येष्ठ साहित्यिक, शिक्षण तज्ञ प्रा पंढरीनाथ मांडवगणे (वय ९२) यांचे पुणे येथील रूग्णालयात वृद्धापकाळाने आज निधन झाले.

विदर्भ साहित्य संघाच्या स्थापनेपासून ते सदस्य होते. ज्येष्ठ नेते स्व. नानासाहेब वैराळे यांनी अकोला येथे आयोजित केलेल्या पहिल्या अ. भा. नाट्य संमेलनामध्ये प्रा पंढरीनाथ मांडवगणे यांची मोठी भूमिका होती. अकोला जिल्हा पत्रकार संघाच्या एका कार्यक्रमात प्रा मांडवगणे प्रमुख अतिथी होते. साहित्यिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान होते. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, एक मुलगी, नात, जावई आणि मोठा आप्त परिवार आहे.

# रेल्वेमध्ये ८० रुपयांत मिळणार शाकाहारी जेवण

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १६ :
जर तुम्ही ट्रेनमध्ये प्रवासादरम्यान खाण्यापिण्याची व्यवस्था केली नसेल, तर काळजी करण्याची गरज नाही. प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वेने शाकाहारी जेवणाची (स्टँडर्ड कॅसरोल) किंमत आणि त्याचे संपूर्ण मेन्यू जाहीर केले आहे.

देशभरात दररोज हजारो लोक रेल्वेने प्रवास करतात. लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी अनेक प्रवासी घरून जेवण घेऊन येतात. पण असेही काही लोक असतात जे घरचे जेवण आणू शकत नाहीत.

अशा वेळी ते स्टेशनवर मिळणाऱ्या किंवा ट्रेनमधील पॅन्ट्रीमधील खाण्यावर अवलंबून असतात. अशा प्रवाशांच्या सोयीचा विचार करून रेल्वेने शाकाहारी जेवणाची (स्टँडर्ड कॅसरोल) किंमत आणि त्याचे संपूर्ण मेन्यू जारी केले आहे.

अनेकदा प्रवाशी घरून जेवण आणू शकत नाहीत. अशा वेळी त्यांना स्टेशनवर किंवा ट्रेनमध्येच जेवण खरेदी करावे लागते.



त्याचबरोबर, रेल्वेने ठरवलेल्या किमतीची माहिती नसलेल्या प्रवाशांची संख्याही खूप मोठी आहे. त्यामुळे, रेल्वे मंत्रालयाची ही माहिती सर्व प्रवाशांसाठी खूप महत्त्वाची ठरते. रेल्वेने स्टेशनवर मिळणाऱ्या शाकाहारी जेवणाची (स्टँडर्ड कॅसरोल) किंमत ७० रुपये निश्चित केली आहे, तर ट्रेनमध्ये त्याची किंमत ८० रुपये ठरवली आहे.

रेल्वे मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, शाकाहारी जेवणाच्या (स्टँडर्ड कॅसरोल) मेन्यूमध्ये साधा भात (१५० ग्रॅम), घट्ट डाळ किंवा सांबार (१५० ग्रॅम), दही (८० ग्रॅम), २ पराठे किंवा ४ पोळ्या (१०० ग्रॅम), भाजी (१०० ग्रॅम) आणि लोणच्याचे पाकीट (१२ ग्रॅम) दिले जाते.

रेल्वेने म्हटले आहे की, प्रवासादरम्यान कोणत्याही प्रवाशाकडून रेल्वे स्टेशनवर किंवा ट्रेनमध्ये शाकाहारी जेवणासाठी (स्टँडर्ड कॅसरोल) जास्त पैसे आकारले गेल्यास, किंवा ठरवलेल्या मेन्यूममधील पदार्थांची संख्या कमी असल्यास, प्रवासी थेट रेस्टॉरंट किंवा पॅन्ट्री कर्मचाऱ्यांविरुद्ध रेल्वेकडे तक्रार दाखल करू शकतात.

त्यानंतरही कर्मचारी ऐकत नसल्यास, प्रवासी रेल्वे स्टेशनवरील अधिकाऱ्यांकडेही तक्रार करू शकतात. अशा प्रकरणांमध्ये प्रवासी सोशल मीडियाव्यतिरिक्त रेल्वे हेल्पलाइन क्रमांक १३९, रेल वन ॲप आणि रेल मदत द्वारेही तक्रार करू शकतात.